CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार,दि. १३ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : १६ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## पैशाच्या कारणावरून पतीला चाकूने तर वृद्ध सासऱ्याला दगडाने मारले

**सोलापूर** : पैशाच्या कारणावरून पतीला कांदा कापण्याच्या चाकूने तर वृद्ध सासऱ्यांना दगडाने मारहाण केल्याची घटना मार्डी (ता.उत्तर सोलापूर) येथे काल मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात अभिमन्यू महादेव नारायणकर (वय ६६ रा.मार्डी) यांनी तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे त्यांची सून सारिका राजेंद्र नारायणकर हिच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. काल सकाळी सारिका हिने तिचा पती राजेंद्र नारायणकर याला कांदा कापण्याच्या चाकूने ओठावर आणि कपाळावर मारहाण केली. सासरे, अभिमन्यू यांना दगडाने मारली. तर सासू मथुराबाई यांना शिवीगाळ केली. अशी नोंद पोलिसात झाली सहाय्यक फौजदार घोळवे पुढील तपास करीत आहेत.

## आईवर कोयत्याने हल्ला; निंबोणी येथे मुलगा आणि सुनेविरुद्ध गुन्हा

**मंगळवेढा** : मंगळवेढा-उसने घेतलेले पैसे परत का देत नाही. या कारणावरून मुलाने स्वतःच्या आईला कोयत्याने तर सुनेने काठीने बदडून गंभीर जखमी केले. ही घटना निंबोणी येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. भामाबाई भारत चौगुले (वय ५० रा. निंबोणी ता.मंगळवेढा) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचा मुलगा रतिलाल भारत चौगुले आणि सून इंदू रतिलाल चौगुले यांच्यावर मंगळवेढाच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला. यावेळी झालेल्या मारहाणीत भामाबाई यांचे हात फ्रॅक्चर झाले. आणि गळ्यातील दागिने देखील गहाळ झाले. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार येलपले पुढील तपास करीत आहेत.

# ...तरीही पळवापळवी सुरूच

**सुराज्य/सोलापूर**

उभी शिवसेना फोडली... आमदार पळवले. महाराष्ट्र खालसा केल्यानंतर लोकसभेकडे वळले... खासदार पळवले. विस्तार करून बस्तान बसवण्यासाठी शाखा प्रमुखांपासून जिल्हाप्रमुखांनाही पळवले. पहिल्यांदा बाळासाहेबांचा विचार पळवला... नंतर बाळासाहेबांनाच पळवले. उरलीसुरली शिवसेना घेऊन पक्षप्रमुख उध्दव ठाकरे अंधेरीची पोटनिवडणूक लढवण्यासाठी सज्ज झाले... अन् त्यांचा उमेदवारच पळवण्याचा प्रयत्न सुरू झाला. उमेदवार ठाम दिसताच त्यांची उमेदवारीच पळवण्याचा प्रकार सुरू झाला. आमदार पळवले, सत्ता पळवली, पक्ष पळवला, पक्षाचे चिन्ह पळवले, पक्षाचे नावही पळवले. काहीही करायचे आणि उध्दव ठाकरेंना सळो की पळो करून सोडायचे; हा शिंदे गटाचा अजेंडा असून पळवापळवी हाच त्यांचा झेंडा असल्याचा प्रत्यय अंधेरी पोटनिवडणुकीत दिसून येत आहे.



मुंबईतील अंधेरी पूर्व विधानसभेचे आ. रमेश लटके यांच्या निधनामुळे त्याठिकाणी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. दिवंगत आ. लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना शिवसेनेच्या ठाकरे गटाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. पहिल्यांदा ऋतुजा लटके यांनाच आपल्या गटात खेचण्याचा प्रयत्न शिंदे गटाकडून करण्यात आला. मात्र त्यात फारसे यश येत नाही असे दिसताच त्यांची उमेदवारीच कायद्याच्या कचाट्यात अडकवण्याचा डाव टाकण्यात आला आहे.

कारण लटके ह्या मुंबई महापालिकेत नोकरीस असल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागणार आहे. परंतु महापालिका आयुक्त आणि सामान्य प्रशासन विभागाकडून अद्यापही तो मंजूर करण्यात आलेला नाही. परिणामी त्यांची उमेदवारीच लटकली आहे.

# लटकेंची उमेदवारी लटकावली

### दुसऱ्यांदा राजीनामा

लटके यांनी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून २ सप्टेंबर रोजी राजीनामा दिला होता. मात्र २९ सप्टेंबर रोजी फेटाळण्यात आला. त्यामुळे ऋतुजा लटके यांनी ३ ऑक्टोबर रोजी पुन्हा एकदा केलेला राजीनामासुध्दा अद्यापही मंजूर केला नाही. पालिका आयुक्त इकबाल चहल यांच्यावर शिंदे गटाचा राजकीय दबाव असल्याने लटकेंचा राजीनामा लटकावला आहे, असा आरोप माजी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी केला आहे.

### हायकोर्टात धाव

दरम्यान, राजीनामा नामंजुरीच्या मुद्यावरून ठाकरे गटाने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यावर गुरूवारी सकाळी ११ वा. न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे. यासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडून संबंधित महापालिकेला नोटीस बजावण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. ॲड. विश्वजित सावंत हे लटके यांच्यावतीने न्यायालयात बाजू मांडणार आहेत.

### मशाल चिन्हावरच निवडणूक लढवणार

माझे पती रमेश लटके हे शिवसेनेशी एकनिष्ठ होते. आमचा परिवारही उद्धव ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ आहे. मी जर निवडणूक लढवली तर ती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात व मशाल या चिन्हावरच लढवणार आहे, असा दावा उद्धव ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटके यांनी यावेळी केला.

### माझ्यावर दबाव नाही

ऋतुजा लटके यांच्या राजीनाम्याबाबत प्रक्रिया सुरू आहे. मात्र पालिका नियम असे सांगतो की, एखाद्या कर्मचाऱ्याने आपल्या नोकरीचा राजीनामा सादर केला तर ३० दिवसांत त्याबाबत निर्णय घेता येतो. ऋतुजा लटके यांनी त्यांच्या नोकरीचा राजीनामा हा ३ ऑक्टोबर रोजी सादर केला आहे. मात्र माझ्यावर राज्य सरकारचा कोणताही दबाव नाही, असे प्रतिक्रिया पालिका आयुक्त इक्बाल चहल यांनी दिली.

### अकोला लोकसभेची पुनरावृत्ती

२०१९ मध्ये अकोला लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसकडून डॉ. अभय पाटील हे उमेदवार होते. तत्पूर्वी ते जिल्हा रुग्णालयात अस्थिरोग तज्ज्ञ म्हणून नोकरीस होते. निवडणुकीपूर्वी दीड महिना आधी त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. पण तत्कालीन सार्वजनिक आरोग्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या दबावामुळे राजीनाम्यावर सहीच केली नाही. त्यामुळे पाटील यांची उमेदवारी रद्द झाली. शेवटी काँग्रेसला त्याठिकाणचा उमेदवार बदलावा लागला. तीच खेळी सध्या अंधेरी पोटनिवडणुकीबाबत सुरू असल्याचे बोलले जात आहे.

## शाळा हस्तांतरणासाठी महापालिका पैसे देणार नाही

### जि.प.ने विनामोबदला हस्तांतरण कराव्यात : आयुक्त

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर शहरातील हद्दवाढ भागातील जिल्हा परिषदेच्या ३६ शाळा महापालिकेकडे हस्तांतरण करण्यासाठी महापालिका प्रशासन मोबदला वा पैसे देणार नाही. ती शासनाची जमीन आहे. त्यामुळे विना मोबदला जिल्हा परिषदेने या शाळा महापालिकेकडे हस्तांतरित कराव्यात, असे महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी म्हटले आहे.

सोलापूर शहराची १९९२ मध्ये हद्दवाढ झाली होती. त्यावेळी काही गावे महापालिका हद्दीत वर्ग करण्यात आली होती. आमदार सुभाष देशमुख यांनी १९९२ पासून हद्दवाढ झाली तेव्हा जिल्हा परिषदेच्या ज्या शाळा महानगरपालिका हद्दीत आल्या आहेत त्या शाळा महापालिकेकडे वर्ग कराव्यात, अशी मागणी वेळोवेळी केली होती. तेव्हापासून हा विषय प्रलंबित आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतही हा विषय

**सीईओंना पालिका पाठवणार पत्र**

शाळा हस्तांतरणासाठी महापालिका प्रशासनाकडून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना पत्रव्यवहार करण्यासंदर्भात आदेश आयुक्तांनी दिले आहेत. तातडीने जिल्हा परिषद प्रशासनाकडे पत्रव्यवहार करण्याचे आदेश उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांना आयुक्तांनी दिले.

ऐरणीवर आला होता. आमदारांनीही याकडे लक्ष वेधले होते. जिल्हा प्रशासनाला या शाळेच्या जमिनीचा मोबदला देण्यासंदर्भात चर्चा झाली. दरम्यान, माजी जि.प. सदस्य सुरेश हसापुरे यांनी त्या सर्व शाळांच्या जमिनीची किंमत ६ कोटी काढली होती, ती रक्कम महापालिकेने झेडपीला द्यावी आणि शाळा आपल्या ताब्यात घ्याव्यात, असे म्हटले आहे. दरम्यान, या विषयावर महापालिका आयुक्त शिवशंकर म्हणाले, वास्तविक पाहता शहर हद्दवाढ झाल्यानंतर गावांसह शाळाही जिल्हा प्रशासनाने महापालिकेकडे हस्तांतरण करणे गरजेचे होते. कोणत्याही प्रकारचे कर्ज अथवा सेस फंडातून या शाळेची जमीन झेडपीने खरेदी केली नाही. तर ती शासनाचाच भूखंड आहे. यामुळे महापालिकेकडे हस्तांतरण करण्यासाठी जिल्हा परिषदेला कोणत्याही प्रकारे मोबदला पैसे देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने या शाळा विना मोबदला पालिकेकडे हस्तांतरण कराव्यात.

## मोदींनी केलेल्या नोटबंदी निर्णयाचा तपास होणार

**नवी दिल्ली** : नोटाबंदी प्रकरणावर सुनावणी करताना बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने मोठा एक मोठा निर्णय घेतला आहे. या प्रकरणातील सरकारच्या धोरणात्मक निर्णयांच्या न्यायालयीन पुनरावलोकनाबाबत लक्ष्मण रेखा'



ची पूर्ण माहिती आहे, मात्र हा निर्णय केवळ अर्थव्यवस्थे संदर्भातील मुद्दा होता की आणखी काही हे तपासण्यासाठी सरकारच्या नोटबंदीच्या निर्णयाची चौकशी होणे गरजेचे असल्याचे कोर्टाने म्हटले आहे.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या पुढील सुनावणीसाठी ९ नोव्हेंबर २०२२ ही तारीख निश्चित केली आहे. पंतप्रधान मोदींनी अचानक केलेल्या नोटाबंदीच्या घोषणेनंतर ८० टक्के नोटा निरुपयोगी करण्याच्या घटनात्मक वैधतेला याचिकेत आव्हान देण्यात आले आहे. टर्नी जनरल आर. व्यंकटरमणी म्हणाले की, तर्क सिद्ध करण्यासाठी प्रकरणाची तपासणी करणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

## विजेच्या धक्क्याने तरूणाचा मृत्यू; गोंधळानंतर मदत अन् १२ तासानंतर अंत्यसंस्कार

**सुराज्य/सोलापूर**

सोलापुरातील सात रस्ता परिसरातील वेलनेस झोन इमारतीच्या बेसमेंटमध्ये बुधवारी सकाळी तरुण स्वच्छता कर्मचाऱ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. आफ्रिदी अब्दुल शेख (वय २४ वर्ष, रा,मल्लिकार्जुन नगर,सोलापूर) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. नातेवाईकांना याची माहिती मिळताच मृतदेहाजवळ एकच गर्दी झाली होती.

सदर बाजार पोलिसांनी ताबडतोब घटनास्थळी धाव घेऊन सर्व परिस्थिती नियंत्रणात आणली होती. पण नातेवाईकांनी इमारतीच्या आवारात असणाऱ्या दुकानांवर दगडफेक केली. मृतदेह शासकीय रुग्णालयात हलविण्यात आल्यानंतर तिथे आणि सदर



बाजार पोलीस ठाणे येथे नातेवाईकांनी टोकाची भूमिका घेत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका मांडली. आफ्रिदी अब्दुल शेख हा विवाहित तरुण आहे. त्याला एक अपत्य आहे. आफ्रिदीच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नीला व अपत्याचा सांभाळ कोण करणार,असा सवाल करत, नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयातून मृतदेह ताब्यात घेण्यास साफ मनाई केली. सदर बाजार पोलीस ठाणे येथे जाऊन मृताच्या नातेवाईकांनी इमारतीच्या चेअरमनवर गुन्हा दाखल करा, त्याच्या निष्काळजीपणामुळे आमच्या तरुणाचा मृत्यू झाला आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला. इमारतीचे चेअरमन व सिंहगड इन्स्टिट्यूटचे डॉ.नवले यांनी सोलापूर येथील शासकीय विश्रामगृह येथे नातेवाईकांसोबत बैठक घेतली. यावेळी आफ्रिदी शेख याचे सर्व नातेवाईक मृतदेह शासकीय रुग्णालयात ठेवून शासकीय विश्रामगृह येथे आले.

यावेळी एमआयएमचे माजी नगरसेवक तौफिक शेख देखील उपस्थित होते. वेलनेस झोन इमारतीचे चेअरमन डॉ.नवले यांनी दहा लाखांचा चेक दिला.

## आत्महत्या करणाऱ्या विवाहितेस वाचविले

**सुराज्य/सोलापूर**



घरात एकटी राहू का? मी घर सोडून जाते असे म्हणणाऱ्या सुनेला सासऱ्याने विरोध केला. त्यामुळे तिने रागाच्या भरात दरवाजा बंद करून गळफास घेतली.त्या विवाहितेला दरवाजा तोडून फासातून सोडवून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना नीलम नगर येथील गंगा चौकाजवळ मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली.

संध्या श्रीकांत नामण (वय २२ रा.नीलम नगर,गंगा चौकाजवळ) असे जखमी झालेल्या विवाहितेचे नाव आहे. तिला खाजगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रात्री ११ वाजेच्या सुमारास संध्या हिने घरात मी एकटीच आहे. मी घर सोडून जाते असे म्हणाली. तेव्हा तिचे सासरे कृष्णा यांनी एवढ्या रात्री बाहेर जाऊ नको असे म्हणाले. तेंव्हा तिने रागाच्या भरात दरवाजा आतून बंद केला. आणि ओढणीने गळफास घेतली. हा प्रकार समजताच बंद दरवाजा तोडून तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.




## ओळख निर्माण करण्यासाठी तरुण पिढीने कष्ट केले पाहिजे : रिंकू राजगुरू

**सुराज्य/मंगळवेढा**

कोणत्याही क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करायची असेल तर आजच्या तरुण पिढीने अपार कष्ट केले पाहिजे, असे प्रतिपादन रिंकू राजगुरू यांनी केले त्या दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालयात युवा महोत्सवाच्या बक्षीस समारंभ प्रसंगी बोलत होत्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अठराव्या युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपदाचे प्रथम पारितोषक ९१ गुणांसह बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयाने पटकावले.

दुसऱ्या क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद ५० गुणांसह संगमेश्वर कॉलेज तर ४९ गुण घेऊन अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाने तिसरे पारितोषिक मिळविले. यावेळी त्या पुढे म्हणाले की आजच्या तरुण पिढीने स्वतः कष्ट करावे कोणावरही विसंबून राहू नये आजच्या परिस्थितीत कष्ट केले तर पुढील आयुष्य सुखकर होईल विद्यार्थी दशेमध्ये सतत प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे प्रयत्न करायचे थांबल्यास आयुष्य थांबल्यासारखे राहते म्हणून कष्ट आणि प्रयत्न यांची जोड विद्यार्थ्यांच्या अंगी असणे आवश्यक आहे.

यावेळी प्रेक्षकांनी विचारलेल्या प्रश्नालाही त्यांनी उत्तरे दिली. खा.धनंजय महाडिक म्हणाले की विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या ऋणात राहणे अतिशय महत्त्वाचे आहे दररोज आई-वडिलांचे चरण स्पर्श करूनच बाहेर पडावे त्याचा आशीर्वादाने व तुमच्या मेहनतीने पुढील प्रवास तुमचा सुखकर होणार आहे. जिल्ह्यातील ५७ महाविद्यालयांनी २९ कला प्रकारामध्ये सहभाग नोंदवला होता. यावेळी एकूण महत्त्वाच्या पाच कला प्रकारांचे विभागीय विजेतेपद घोषित करण्यात आले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तो खूप 'कन्फ्युज' झालाय!

| कल्याण |
| --- |
| --------- |

| मेन बाजार |
| --- |
| --------- |

## सीसीएच फसवणूक प्रकरण; आर्थिक गुन्हे शाखेकडे जाणार




**सुराज्य/सोलापूर**

सोलापुरातील एका व्यक्तीने सीसीएच ॲपच्या माध्यमातून तीन लाखाची गुंतवणूक केली. आणि त्याला महिनाभरात १३ लाख मिळाले. हाच मेसेज जवळपास सर्व दूर पोहोचल्याने अनेकांनी लाखो रुपयांच्या रकमा यात गुंतवल्याचे आता पुढे आले आहे.

सीसीएच ॲपच्या माध्यमातून पैसे गुंतल्यावर दुप्पट पैसे आणि तेही अमेरिकन डॉलरच्या रूपात मिळतील या आमिषाला बळी पडलेल्या सोलापूरकरांची शान संख्या दिवसेंदिवस वाढत असून फसवणुकीचा आकडा जरी कागदावर ४५ लाख दिसत असला तरी तो कोटींच्या पुढे असण्याची शक्यता दाट आहे.

फसवणूक झालेल्या सर्वसामान्यांनी तक्रारी दाखल केलेले आहेत. परंतु लाखो रुपये गुंतवणूक केलेले प्रतिष्ठित मात्र पुढे येण्यास धजावत नसल्याचे दिसते. पोलिसांनी नागरिकांना अभय देऊन जास्तीत जास्त गुन्हे दाखल करण्याचे आवाहन करावे अशी मागणी होत आहे.

दरम्यान फसवणुकीचा आकडा हा कोट्यवधीच्या पुढे असल्याने हा तपास शहर आर्थिक गुन्हे शाखेकडे जाण्याची शक्यता आहे. संशयित आरोपींना ताब्यात केली आहे. त्या दृष्टीने तपास चालू आहे. आरोपींनी हा ॲप कुठून मिळवला? त्यादृष्टीने तांत्रिक माहिती ही सायबर विभागाच्या माध्यमातून पुढे येण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने ही अधिकारी वर्ग तपास करत आहेत. फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांनी आरोपींचा कसून तपास करत असल्याचे सांगितले.

CMYK

# काळ अजून सोकावेल...

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून शिवसेनेची वाटणी झाली. चिन्हांची देवाणही झाली. गेल्या काही दिवसांपासून पेटलेल्या संघर्षांवर सुवर्णमध्य साधत आयोगाने पाणी मारल्याने हा राजकीय वणवा थोडा शांत झाला, असे म्हणायला काहीच हरकत नाही पण एकेकाळी एकाच घरात भाऊ-भाऊ म्हणून राहिलेले तसेच राजकीय आखाड्यात खांद्याला खांदा लावून लढलेले शिवसैनिक आज मात्र एकमेकांच्या छातीवर बसायला लागले आहेत. त्यांच्यात वैचारिक हल्ले सुरू झाले आहेत. त्यात भाजपा नेते मात्र मस्त मजा पहात आहेत. २०१९च्या निवडणुकीनंतर आपल्याला मुख्यमंत्री होवू दिले नाही,हा राग भाजपाच्या डोक्यात चांगलाच बसला आहे. राजकीय सूड काय असतो हे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला आज पहायला मिळत आहे. पुढच्या निवडणुकीला आता दोनच वर्षे राहिली. या काळात राज्याचा नव्या सरकारकडून काय विकास होणार हे देवच जाणे. महाविकास आघाडीच्या काळात तिच बोंब झाली.आता शिंदे-फडणवीस सरकार काय दिवे लावणार? असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झाला आहे.आताच्या राजकीय संघर्षाचा लोकांना कंटाळा आलाय. सरकारने लोकांपुढे नेहमी काही तरी विधायक कामे समोर आणावीत. लोकहितार्थ योजना जाहीर कराव्यात,अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असते पण आज जे पहायला मिळत आहे,जे ऐकायला मिळते, त्याची चीड यायला लागली. मराठी माणसाचा संताप अनावर झाला आहे. सत्ताधाऱ्यांना व विरोधकांना कुणी विचारणारा आहे की नाही? अशी या राज्याची उद्विग्नता आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर चिंतन झाले, याचे आम्हाला समाधान वाटत आहे. एका दैनिकाच्या कार्यक्रमात लोकांच्या भावनांना हात घालणारे प्रश्न सत्ताधाऱ्यांना विचारले गेले. आज याची आवश्यकता झाली आहे. राजकारण्यांवर कुणाचा तरी धाक असला पाहिजे. जाब विचारला गेला पाहिजे.नेमकी तीच भूमिका प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांनी वठवली.



राज्याची सद्यस्थिती याविषयावर चिंतन करणारा हा कार्यक्रम होता. पाटेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भ्रष्ट मंत्री आणि राजकीय नेत्यांवरून थेट प्रश्न विचारला.आम्ही म्हणजे जनता १०० रुपये आल्यावर ३० रुपये कर भरतो. तुम्ही म्हणजे सरकार आणखी १८ रुपये जीएसटी घेता. हे करूनही आमच्या चौकशा होतात, तुमच्या म्हणजेच गबरगंड झालेल्या राजकारण्यांच्या चौकशा का होत नाहीत? आज निवडून येणारा मंत्री, नगरसेवक पुढल्या वर्षी कोट्यावधी होतो.नानांचे असे हे दोन प्रश्न पण भेदक होते. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव गेले, तेव्हा त्यांच्या खात्यावर २५ हजार रुपयेही नव्हते. आपले मंत्री, नगरसेवक आज निवडून आले की, पुढच्या वर्षी कोट्याधीश असतात. त्याची चौकशी का होत नाही? लोकांना कळतं की कोण भ्रष्ट आहे. भ्रष्टाचार केवळ राजकारणाला नाही, तर संपूर्ण व्यवस्थेला लागलेली कीड आहे. दुर्दैवाने ही कीड संपवायची असेल, तर खूप सामूहिक प्रयत्न करावे लागतील. कारण, भ्रष्टाचारासाठी तुरुंगात जाऊन आलेले, अनेक प्रकरणांमध्ये अडकलेले असे लोक खूप मोठ्या बहुमताने निवडून येतात. त्यांना लोक वारंवार निवडून पाठवतात. त्यामुळे समाजात भ्रष्टाचाराविषयी कुठलाही तिरस्कार तयार होत नाही,असे फडणवीसांचे नानांच्या प्रश्नावर उत्तर आहे.फडणवीस यांची ही भूमिका न पटणारी आहे. जोपर्यंत समाज चांगल्याला चांगलं म्हणणार नाही आणि वाईटाला वाईट म्हणणार नाही तोपर्यंत ही परिस्थिती बदलणार नाही. त्यामुळे आपल्याला सामूहिक प्रयत्न करावे लागतील. अनेकदा लोक विचारतात की त्या उमेदवारावर इतके गुन्हे आहेत तरी कसं तिकिट देता? तेव्हा आम्हाला सांगावे लागते की, त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत, पण तोच निवडून येतो. दुसरीकडे सुंदर, साळसुद, स्वच्छ उमेदवार उभे केले की त्याचे डिपॉझिट जप्त होते.सत्तेतून संपत्ती आणि संपत्तीतून सत्ता हे आपल्या राजकारण्यांचे ब्रीद झाले आहे.गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा राजकारणात प्रवेश झाला आहे. ही मंडळी लोकांवर दहशत ठेवत आपले राजकीय स्वार्थ साधून घेत आहेत.शेवटी जबाबदारी येऊन पडते ती समाजावर.समाजाने आता जागल्याची भूमिका घेतली पाहिजे.राजकारण्यापुढे केवळ माना हलवून वा टाळ्या पिटवून चालणार नाही.राजकारणाचे शुद्धीकरण करण्यासाठी चांगल्या उमेदवाराची निवड केली पाहिजे. राजकारणी अयोग्य वागत असतील तर त्यांना जाब विचारण्याची हिम्मत दाखवली पाहिजे.मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधायची? असे म्हणून समाज शांत राहिला तर काळ अजून सोकावत जाईल. लोकशाहीसाठी हाच मोठा धोका आहे.

---

राजकीय

# ठाकरे x शिंदे

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या महाआघाडी सरकारमध्ये शिवसेनाप्रमुखांच्या पुत्राला मुख्यमंत्रीपद मिळाले, नातवाला कॅबिनेट मंत्रीपद मिळाले. पण अडीच वर्षे त्या सरकारचे आयुष्य राहिले. शिवसेना दुभंगली, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सेनेत उठाव झाला. आता निवडणूक आयोगाने तात्पुरते का होईना धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह गोठवले आणि नुसते शिवसेना हे नाव लावायलाही मनाई केली. उद्धव यांच्या गटाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे', तर शिंदे गटाला बाळासाहेबांची शिवसेना' असे नाव दिले आहे. महाआघाडीने दिलेली सत्ता, शिवसेनाप्रमुखांनी ५६ वर्षांपूर्वी एका ध्येयाने स्थापन केलेल्या शिवसेनेच्या मुळावर आली. आजही उद्धव यांना सोनिया गांधी आणि शरद पवार यांची साथ मोलाची वाटत आहे. गेली पंचवीस वर्षे भाजपबरोबर युतीत सडलो, अशी भूमिका उद्धव यांनी मांडून भाजपकडे जाण्याचे दोर त्यांनी स्वतःच कापून टाकले आहेत.

दसरा मेळावा ही शिवाजी पार्क मैदानावर शिवसेनेची मक्तेदारी होती. पंचावन्न वर्षांचा त्याला इतिहास आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे या वर्षीही उद्धव गटाचा दसरा मेळावा शिवाजी पार्क मैदानावर झाला. पण त्याच दिवशी, त्याच वेळी एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील बीकेसीवर (बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स) दसरा मेळावा घेऊन विराट शक्तिप्रदर्शन केले. सर्वात मोठा मेळावा कोणता, या प्रश्नाची चर्चाही मोठी झाली. शिवाजी पार्कपेक्षा बीकेसीवर गर्दी दुपटीपेक्षा जास्त होती, हे एकनाथ शिंदे यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल. इतकी वर्षे शिवसेनेचे सभा, मेळावे व इव्हेंट साजरे करण्यात एकनाथ शिंदे व त्यांची टीम राबत होती. आता त्यांच्याच सभा व मेळावे त्यांचीच टीम जोरदार उत्साहाने साजरे करीत आहे. मग ते देखणे होणारच. इतकी वर्षे शिवसेनेचे भव्य व्यासपीठ उभारणारे, राबणारे हात आता शिंदे गटाकडे आहेत. एकनाथ हे मोठा जनाधार असलेले नेतृत्व आहे आणि त्यांच्याबरोबर सरकारमध्ये कुशाग्र बुद्धिमत्ता आणि कुशल रणनीती आखणारे देवेंद्र फडणवीस हे राजकारणातील चाणक्य आहेत. शिंदे-फडणवीस एकत्र आहेत व त्यांच्या पाठीशी मोदी-शहांचा भक्कम आशीर्वाद आहे. यापेक्षा राज्यात दुसरी कोणती मोठी शक्ती असू शकते? म्हणूनच शक्तिप्रदर्शनामध्ये एकनाथ शिंदे हे उद्धव गटाला भारी ठरले, हे बीकेसीवरील दसरा मेळाव्यातून स्पष्ट झाले.

एकनाथ शिंदे यांचे भाषण सत्त्याऐंशी मिनिटे झाले, फारच लांबड लावली होती. त्यांचे भाषण सुरू झाल्यावर अनेक लोक उठून निघू लागले, त्यांनी भाषण वाचून दाखवले, त्यांचे भाषण म्हणजे भाजपची स्क्रिप्ट होती, मेळाव्यावर दहा कोटी खर्च झाले, हे पैसे आणले कोठून? अशी प्रश्नावली उद्धव गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून डागण्यात आली. सोनिया गांधी पंचवीस वर्षे काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्या आजही बारा मिनिटांचे भाषण वाचून दाखवतात, त्याविषयी या कोणी प्रश्न विचारले असे कधी घडले नाही. बीकेसी मेळाव्यासाठी दुपारी १२ वाजल्यापासून लोक तिथे संपूर्ण राज्यातून आले होते, त्याविषयी प्रश्नकर्त्यांना कौतुक नाही.



मेळाव्यासाठी पैसे भरून बसेस आणल्या, तर पैसे कोठून आणले असे विचारण्यातच त्यांना धन्यता वाटते. दूरवरून आलेल्या लोकांना भोजन दिले, तर भोजनावळी अशी टिंगल केली. या लक्षावधी लोकांनी पायी चालत यावे व त्यांना उपाशी ठेवावे, अशी महाआघाडी नेत्यांची अपेक्षा होती काय?

एक रिक्षावाला, सामान्य शिवसैनिक, ठाण्यातील टेंभी नाक्यावरचा धर्मवीर आनंद दिघे यांचा शिष्य बीकेसी मैदानावर चार लाखांच्या विराट मेळाव्यात भाषण करतो व त्यांचे भाषण ऐकायला महाराष्ट्रातून, प्रत्येक जिल्ह्यांतून लोक येतात, हेच मोठे कौतुकास्पद आहे. पण आपल्याला महाराष्ट्रात मोठा विरोधक उभा राहतो आहे, ही पोटदुखी उद्धव गटाला असावी. राजकारणात एकमेकांवर आरोप - प्रत्यारोप होतच असतात. पण ते करताना मर्यादा ओलांडायची नसते. बाप मंत्री, कार्ट खासदार, कोणाचा आमदार आणि पुन्हा डोळे लावून बसलाय, नातू नगरसेवक... अरे हो, त्याला शाळेत तर जाऊ दे...' असे बोलून उद्धव यांनी काय साधले... एकनाथ यांचा डॉक्टर असलेल्या मुलाचा कार्ट म्हणून उल्लेख केलाच. पण त्यांच्या दीड वर्षाच्या नातवाचा राजकीय टीकेसाठी उल्लेख कशासाठी केला. महाआघाडी सरकारमध्ये मंत्री म्हणून शपथ घेताना, काँग्रेस-राष्ट्रवादीच्या मांडीला मांडी लावून बसला होतात, तेव्हा काय स्वतःची दाढी तोंडात जात होती का?, असा प्रश्न विचारून उद्धव यांच्या मनात एकनाथ विषयी किती संताप आहे हे दिसून आले. दि. १९ जून १९६६ रोजी स्थापन झालेल्या शिवसेनेकडे धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह १९८९ पासून आहे. गेली तेहतीस वर्षे धनुष्यबाण ही शिवसेनेची निवडणुकीतील ओळख आहे. १९६८ मध्ये राजकीय पक्ष म्हणून शिवसेनेने नोंदणी केली, त्यानंतर वेगवेगळ्या चिन्हांवर सेनेने निवडणुका लढवल्या. १९८० पर्यंत झाड, रेल्वे इंजिन, ढाल-तलवार अशी चिन्हे घेऊन सेनेने निवडणुका लढवल्या होत्या. १९८४ मध्ये भाजपबरोबर युती करून भाजपच्या कमळ चिन्हावर लोकसभा निवडणूक शिवसेनेने लढवली. १९८५ विधानसभा निवडणूक मशाल, बॅट-बॉल, सूर्य अशा चिन्हांवर सेना लढली. निवडणूक चिन्ह बदलले गेले किवा गोठवले गेले अशी पाळी यापूर्वी अनेक राजकीय पक्षांवर आलेली आहे. भारतीय जनसंघांचे चिन्ह पणती होते. त्यावेळी जोरसे बोलो दीपक दीपक, प्रेमसे बोलो दीपक दीपक', अशा घोषणा दिल्या जात असत. आणीबाणीनंतर जनता पक्षात अनेक विरोधी पक्ष विलीन झाले, त्यात जनसंघही विलीन झाला. दुहेरी सदस्यत्वावरून जनता पक्षात जनसंघ व समाजवादी यांचे खूप वादविवाद झाले. अखेर जनता पक्षाचे सरकार कोसळले. पूर्वीच्या जनसंघाने अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली १९८० मध्ये भारतीय जनता पार्टी असा नवा पक्ष स्थापन केला. भाजपला कमळ हे चिन्ह मिळाले.

काँग्रेस पक्षाचे निवडणूक चिन्हही अनेकदा बदलले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या निवडणुका काँग्रेसने बैलजोडी या चिन्हावर लढवल्या होत्या. १९६९ काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली. मोरारजी देसाई व कामराज यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस (ओ) व इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस (आर) उभी राहिली. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसला गाय-वासरू हे चिन्ह मिळाले. तेव्हा गाय-वासरू नका विसरू' अशी घोषणा लोकप्रिय झाली होती. १९७८ काँग्रेसमध्ये पुन्हा फूट पडली व इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला पंजा हे चिन्ह मिळाले. पंजा चिन्ह घेऊन त्यांनी १९८० मध्ये निवडणूक लढवली आणि आणीबाणीनंतर गमावलेली सत्ता पुन्हा काबीज केली. न जात पर न पात पर, मुहर लगेगी हाथ पर', अशी तेव्हा घोषणा होती. शरद पवारांनी काँग्रेसमधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. तेव्हा त्यांच्या पक्षाला घड्याळ चिन्ह मिळाले. त्यापूर्वी पवारांनी काँग्रेसच्या वेगवेगळ्या चिन्हांवर निवडणूक लढवली होती.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उठावानंतर शिवसेनेने राज्याचे मुख्यमंत्रीपद गमावले, महाराष्ट्राची सत्ता गमावली, ४० आमदार व १० समर्थक असे ५० आमदार गमावले. १२ खासदार गमावले आणि शिवसेना हे चार अक्षरी नावही गमावले. एवढेच नव्हे तर शिवसेनाप्रमुखांचा व्यक्तिगत सेवक थापालाही गमावले. शिंदे यांना मिळालेल्या पक्षाच्या नावात ठाकरे हे नाव नाही म्हणून उद्धव गटात आनंद व्यक्त होत आहे. पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे म्हणजे एका कुटुंबाच्या मालकीचा पक्ष होतोय, हे त्यांच्या लक्षात आलेले नाही. शिंदे गटाविरोधात प्रचार करताना बाळासाहेबांच्या शिवसेनेला पराभूत करा, असे उद्धव सांगणार काय? असा प्रश्न नेटकऱ्यांनी विचारला आहे.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

---

टुडेज ब्लॉग

# नव्या संसदभवनापुढील आव्हाने

आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वीच्या २०२३-२४ च्या शेवटच्या पूर्ण अर्थसंकल्पाने संसदेच्या नव्या वास्तूचा शुभारंभ होईल? संसद भवनाचे बांधकाम पूर्वनिर्धारित वेळापत्रकानुसार शंभर टक्के पूर्ण होण्याच्या शक्यतेविषयी शंका व्यक्त करण्यात येत असली तरी हिवाळी अधिवेशन नव्या वास्तूमध्येच व्हावे, यासाठी मोदी सरकारने प्रतिष्ठा पणास लावली आहे.

नव्या वर्षात ब्रिटिश आणि नेहरूकालीन वास्तुशिल्पकलेचा ठसा असलेल्या ल्युटन्स दिल्ली'चा चेहरामोहरा बराच बदललेला दिसणार आहे. विशेषतः ६४ हजार ५०० चौरस मीटर क्षेत्रफळात उभारण्यात आलेली संसदेची नवी इमारत, सेंट्रल व्हिस्टा प्रकल्प आणि दीडशे एकरात पसरलेले प्रगती मैदानाच्या माध्यमातून हा बदल प्रामुख्याने जाणवेल. नव्या संसद भवनाच्या उद्घाटनाच्या आसपास, एक डिसेंबरपासून पुढच्या वर्षभरासाठी भारताला जी-२० देशांचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळेल. अकरा महिन्यांनंतर प्रगती मैदानावर जी-२० देशांच्या संमेलनाच्या आयोजनाने हा मान शिखरावर पोहोचेल तेव्हा नेहरूकालीन प्रगती मैदान विस्मृतीत ढकलले गेलेले असेल.



या निमित्ताने खरीप आणि रब्बीच्या हंगामातील कापणीनंतर वाया जाणाऱ्या शेतकचऱ्यापासून बांधकामात वापरण्यायोग्य पर्यावरणपूरक पोकळ विटांची संकल्पना मांडली जात आहे. नव्या संसद भवनाचे शेतकचऱ्याच्या पुनर्वापरातून तयार केल्या जाणाऱ्या अशा विटांच्या साह्याने बांधकाम केले असते, तर २३४० टन कार्बन डायऑक्साईड हवेतील उत्सर्जनाआधीच साठवता आला असता. ७७२२ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन रोखले गेले असते.

पुढच्या दीडशे वर्षांच्या गरजा लक्षात घेऊन आज उपलब्ध असलेल्या जगातील सर्व अत्याधुनिक सुविधांनिशी नावारूपाला येणाऱ्या नव्या संसद भवनाच्या उदरात नजीकच्या भविष्यातील अनेक राजकीय पेचप्रसंगही दडलेले आहेत. असदुद्दीन ओवेसी यांच्या सूचनेवरून मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी तेलंगणच्या नव्या सचिवालयाला घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिले. त्यापाठोपाठ नव्या संसद भवनालाही डॉ. आंबेडकरांचे नाव देण्याची मागणी जोर धरत असून त्याचे काँग्रेस आणि मायावतींच्या बसपासह देशभरातील सर्व आंबेडकरवादी पक्ष समर्थन करण्याची दाट शक्यता आहे. मोदी सरकारपुढे त्यावर तोडगा काढण्यासाठी मर्यादित पर्याय असतील. नव्या संसद भवनात लोकसभेच्या ८८८, राज्यसभेच्या ३८४ आणि लोकसभेत उभय सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनात १२७२ खासदार बसू शकतील एवढी व्यवस्था आहे. लोकसभेची आसनक्षमता वाढविण्यामागचा उद्देश नजीकच्या भविष्यात लोकसभेचे संख्याबळ वाढविण्याचा आहे. २०२१ च्या लोकसंख्येच्या आधारे २०२६ मध्ये लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना करायचीच झाल्यास लोकसभेच्या संख्याबळात लक्षणीय वाढ होईल. त्याचा सर्वाधिक लाभ उत्तर प्रदेश आणि बिहारसह उत्तर भारतातील राज्यांना होईल. देशाची आर्थिक प्रगती दक्षिण आणि पश्चिमेकडील राज्यांनी करायची आणि त्याचा राजकीय लाभ हिंदीभाषिक उत्तर भारताने उठवायचा, ही असंतुलनाची भावना लोकसंख्येच्या बाबतीत कमजोर असलेल्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये आधीपासूनच खदखदत आहे.

नव्या त्रिभुजाकार संसद भवनाच्या बांधकामाचे बजेट ९७१ कोटींवरून बाराशे कोटी रुपयांवर गेले आहे. शिवाय चालू वर्षाअखेर संसद भवनाचे काम शंभर टक्के पूर्ण होईलच, याची शाश्वती नाही. अर्थात कितीही प्रबळ इच्छाशक्ती असली तरी कुठलाही महत्त्वाकांक्षी बांधकाम प्रकल्प सहसा ठरल्यावेळी पूर्ण होत नाही. मात्र, वेगवान बांधकामाच्या बाबतीत राजधानी दिल्लीतील मोदी सरकारची कामगिरी नेत्रदीपक ठरली आहे. ल्युटन्स दिल्लीतील अनेक ओसाड भूखंडांवर अल्पावधीत उभ्या झालेल्या चकचकीत इमारती त्याची साक्ष देत आहेत. याबाबतीतील मोदी सरकारची संवेदनशीलता लक्षात घेता २६ नोव्हेंबरच्या संविधान दिनी देशवासीयांना नव्या संसद भवनाचे दर्शन घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. नव्या संसद भवनाची नेत्रसुखदता मोदी आणि नेहरू समर्थकांच्या दृष्टिकोनावर अवलंबून असेल. पण संसदेच्या नव्या वास्तूमध्ये देशापुढे नवी आव्हाने उभी ठाकणार यात शंका नाही.

**– सुनील चावके.**

---

बोधकथा

## लालसेपायी जीव गेला



जय आणि विजय यांच्यात घनिष्ट मैत्री होती. दोघेही पट्टीचे पोहणारे होते. नदीच्या पाण्यात भरपूर मस्ती केली. तितक्यात स्थानिक प्रशासनाकडून बंधा-याकडून पाणी सोडण्यात येत असल्याची सूचना देण्यात आली. त्यामुळे दोघेही नदीच्या बाहेर आले. जेव्हा बंधाऱ्यातील पाणी सोडण्यात आले तेव्हा नदीला पूर आल्यासारखी स्थिती निर्माण झाली. जय आणि विजय सुरक्षित स्थळी थांबले होते. नदीच्या पाण्याचा ओघ पाहत असतानाच नदीच्या प्रवाहात एक घोंगडी तरंगत येत असल्याचे दोघांच्याही दृष्टीस पडतील. विजयला ती घोंगडी ओढून आणावीशी वाटली. जयने त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु विजयने तोपर्यंत पाण्यात उडी मारली होती. तो घोंगडीजवळ गेला आणि तिला ओढत असतानाच त्याचे संतुलन बिघडले. मित्र असा संकटात सापडलेला पाहून जय ओरडला,''अरे मित्रा, घोंगडी सोड आणि परत निघून ये'' पण विजय म्हणाला,'' अरे जय मी घोंगडी सोडण्याचा खूप प्रयत्न करतो आहे पण घोंगडीनेच मला धरून ठेवले आहे.'' जयला कळून चुकले की विजयला त्या घोंगडीची लालसा निर्माण झाली आहे. विजयने घोंगडीसह किनाऱ्यावर येण्याचा खूप प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला. शेवटी तो पाण्यात मृत्युमुखी म्हणतात.

**तात्पर्य : कोणत्याही प्रकारची लालसा प्रसंगी आपल्या जीवाशी खेळू शकते.**

---

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल -१



कारण मानवयोनी सोडून अन्य जीवयोनी या केवळ भोगयोमी होत. त्यांना केवळ आपल्या कृतकर्मांची फळे भोगण्यासाठीच शरीर मिळाले असते, कर्म करण्यासाठी नव्हे. परंतु मनुष्याला मात्र कर्मफळे भोगण्यासाठी आणि त्याबरोबरच नवी कर्मे करण्यासाठी शरीर मिळालेले असते. मनुष्य हा 'भोक्ता' असतो तसाच 'कर्ता' देखील असतो.

सर्व पशुपक्ष्यांत मनुष्य का बरे वेगळा आहे? त्यालाच धर्माचरण करायला का सांगितले जाते? तुम्ही पाहता काही काही प्राण्यांना दोन पाय आहेत तर काही प्राण्यांना चार पाय आहेत. कृमिकिटकांना तर अनेक पाय असतात. पाय सर्वांना आहेत. परंतु हात मात्र केवळ मनुष्यालाच मिळाले आहेत. भलेही काही प्राणी हाताचे काम पायांनी करत असतील. परंतु पाय म्हणजे हात नव्हेत. माकड हा उत्क्रांतीच्या दृष्टीने मनुष्याच्या आधीचा टप्पा मानला जातो. त्याला अविकसित स्वरूपातील दोन हात मिळालेले आहेत. हातात फळ घेऊन तो ते खाऊ शकतो. काही काळ मागच्या दोन पायांवर उभे राहून चालू शकतो. परंतु शेवटी तो आपल्या हातांचा उपयोग पाय म्हणूनच करतो. इतर प्राणी मात्र हात नसल्यामुळे तोंडाने खाऊ शकतात. उत्क्रांतीच्या दृष्टीने माकड म्हणजे अर्धविकसित मनुष्य आहे. पुढे त्याचाच शरीरविकास होऊन मनुष्याला दोन स्वतंत्र हात आणि पाय मिळाले. त्याला चालण्यासाठी दोन पाय आहेत आणि कर्म करण्यासाठी दोन हात आहेत.

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

जनमानस

## महिलांचा ऑनलाईन छळ थांबवावा

सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांना दूरच्या अंतराची, वेळेची अडचण न भासता संपर्क साधता येईल अशा संकल्पना होत्या. त्यादृष्टीने सुरुवात देखील झाली, नवनवे प्लॅटफॉर्म्स निर्माण झाले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या कामांसाठी अपेक्षित होता त्याबरोबरीने तेथे गैरप्रकारांना सुरुवात झाली. विशेषतः महिलांच्या बाबतीत !. अनेक महिलांना ऑनलाईन गैरवर्तन, छळांचा सामना करावा लागत असतो. काही तरुणींना शारीरिक अत्याचार करण्याच्या किंवा लैंगिक अत्याचारांच्या धमक्या देण्याचे प्रकार वाढू लागले. काही महिलांवर शारीरिक अत्याचाराच्या धमक्यांमुळे मानसिक परिणाम वाढून व्यक्तिगत कौटुंबिक ताण तणाव वाढू लागले. यामागची कारणे शोधून काढण्यासाठी भारतीय मुलींच्या हक्क आणि समानतेसाठी काम करणाऱ्या प्लॅन इंटरनॅशनल या स्वयंसेवी संस्थेने ब्राझील, नायजेरिया, स्पेन, थायलंड, अमेरिका व भारतासह अन्य२२ देशांतील १५ ते २५ वयोगटातील १४ हजार मुली, तरुणींशी संपर्क साधून सर्वेक्षण केले. त्यात ५८ टक्के जणींनी त्यांना सोशल मीडियावर अत्याचाराचा सामना करावा लागत असल्याचे कबूल केले. सर्वेक्षणातील २० टक्के जणींनी सोशल मीडियाचा वापर कमी केला किंवा थांबविला. फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सप, स्नॅपचॅट, ट्विटर, टिकटॉक या प्लॅटफॉर्म्स वर गैरवर्तणूक मिळत असल्याच्या तक्रारींची नोंद घेऊन प्लॅन इंटरनॅशनल या सर्वेक्षण करणाऱ्या संस्थेने महिलांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यास धोका निर्माण होत आहे असे मत मांडले. सोशल मीडियाचा वापर करणाऱ्या जगभरातील कित्येक महिलांनी प्रत्येक कंपन्यांना महिलांवरील गैरवर्तणूकींच्या तक्रारी नोंदविण्यासाठी अधिक प्रभावी मार्ग तयार करण्याचे आवाहन केले आहे. सोशल मीडिया माध्यमे ही सुशिक्षितांसाठी मिळालेले वरदान आहे ते वरदान म्हणूनच दीर्घकाल टिकून राहावे, शाप ठरू नये ह्याच सामान्यांच्या अपेक्षा आहेत याचा वापरकर्त्या प्रत्येकाने विचार करावा.

**– स्नेहा राज**, गोरेगांव

---

# वित्तसंकटावर उतारा

बँकिंग आणि वित्तीय संकटांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविणाऱ्या तिघा अर्थतज्ज्ञांना यंदाचे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले असून, त्यामुळे वित्तीय नियमन आणि बँकिंग व्यवस्थेच्या संरक्षणाचा पाया घालणाऱ्या सिद्धांतांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. करोना साथीनंतर जगावर अजूनही आर्थिक संकट घोंगावत असल्याने अर्थव्यवस्था सावरण्याच्या आव्हानाला बहुतेक देश सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर वित्तीय संकटावर भाष्य करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांना मिळणारे पारितोषिक समयोचित ठरावे. बेन एस. बर्नान्की, डग्लस डब्ल्यू डायमंड आणि फिलिप एच. डिब्विग या तिघा नोबेल विजेत्या अर्थतज्ज्ञांचा अभ्यास या दृष्टीने महत्त्वाचा आहे.



१९८० च्या काळात झालेल्या या अभ्यासामुळे बँकिंग व वित्तीय नियमनाचा पाया घातला गेला. दीर्घ काळासाठी परिणाम करणाऱ्या १९३०च्या महामंदीचा अभ्यास बर्नान्की यांनी केला. या शतकाच्या सुरुवातीस लेहमन ब्रदर्स' अडचणीत आल्याने आलेल्या संकटाने त्या महामंदीची पुनरावृत्ती होण्याची भीती होती. त्यावेळी बर्नान्की यांनी सरकारचा पुढाकार, वित्तप्रवाह कायम राहण्यासाठी शून्य टक्क्यांवर व्याजदर अशा उपाययोजना मांडल्या; त्यामुळे या संकटातून मार्ग निघाला. अन्य दोघा अर्थशास्त्रज्ञांचे डायमंड-बिग्विग मॉडेल वित्तीय संकटांपासून बचावाचा उपाय म्हणून महत्त्वपूर्ण ठरले. ठेवीदार आणि कर्जदारांमध्ये मध्यस्थ म्हणून काम करणाऱ्या बँकांचे स्थान महत्त्वाचे आहे. गरज लागताच पैसे मिळण्याची ठेवीदारांची अपेक्षा असते, तर दुसरीकडे दीर्घ मुदतीच्या कर्जाला कर्जदारांचे प्राधान्य असते. या दोन्हींचे संतुलन साधणे महत्त्वाचे ठरते. एकाच वेळी अनेक ठेवीदार पैसे मागावयास आले, तर बँकेचे दिवाळे निघू शकते. त्यामुळे व्यवस्थेत स्थैर्य राखणे महत्त्वाचे आहे.

अडचणीच्या काळात सरकारने हमी घेतल्यास बँक वाचू शकते आणि आर्थिक संकटही रोखता येते, असे त्यांनी सप्रमाण मांडले. त्याची प्रचीती जगभरात वारंवार आली. भारतातही येस बँक' आणि पंजाब व महाराष्ट्र बँक' या बँकांच्या अडचणीच्या काळात सरकारने पुढाकार घेतला होता; तसेच पुण्यातील सुवर्ण सहकारी बँके'च्या विलीनीकरणासारख्या प्रयोगांमुळे सर्वसामान्य ठेवीदार बचावले. अर्थव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी बँकांचे अस्तित्व कायम ठेवणे आवश्यक असते, हा या अर्थशास्त्रज्ञांचा सिद्धांत आहे. मात्र, केवळ नियमनासाठी सुलभ व्यवस्था व्हावी, या उद्देशाने देशात काही मोजक्याच बँकांचे अस्तित्व राहावे, या दिशेने गेल्या दशकभरात सरकारी पावले पडत आहेत. त्यावरही साधकबाधक चर्चा होणे आवश्यक आहे. यंदाच्या नोबेल पारितोषिकातून भारताने घेण्याचा हाच धडा आहे.

---

# बँकिंग व्यवस्थेचा मागोवा

बँकिंग हा शब्द म्हटलं तर आपल्या रोजच्या वापरातला. बँकिंग व्यवहार आपण सारे रोजच करत असतो. प्रत्यक्ष बँकेच्या शाखेत जाऊन म्हणा, एटीएमद्वारे म्हणा, ऑनलाइन म्हणा किंवा मोबाइलवरून म्हणा, आपण बँकिंग व्यवहार करत असतो. अगदी कालपर्यंत बँकेच्या शाखेत गेल्यावरच पूर्ण होणारे बँकिंग व्यवहार आज महिनोन्महिने त्या शाखेचे तोंडही न पाहता सुविहित होत असतात. तंत्रज्ञानाची ही कमाल आहेच. त्याचबरोबर बँकिंगनेही काळानुसार स्वरूप बदलले. या नव्या स्वरूपाचा धावता मागोवा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि रिझर्व्ह बँकेचे विभागीय संचालक डॉ. आशुतोष रारावीकर यांनी इंडियन बँकिंग इन रिट्रोस्पेक्ट' या आपल्या छोटेखानी पुस्तकात केला आहे.




मुळात, बँकिंग व्यवस्था ही पाश्चिमात्य आहे अशीच बहुतांश भारतीयांची समजूत आहे. कदाचित बँकिंग या शब्दामुळे ही समजूत झाली असावी. परंतु वेदकाळापासून पैशांचे व्यवहार भारतात होत होते. त्याकाळी बँक ही आजच्यासारखी निश्चितच नव्हती. मात्र, तत्कालीन विनिमय साधनाचे किंवा चलनाचे आदानप्रदान त्यावेळच्या नागरिकांमध्ये निश्चितच होत होते. बँकिंग हा व्यवसाय किंवा हे क्षेत्र कदाचित एकमेव क्षेत्र असेल की जे सामाजिक आणि आर्थिक वातावरणाचे थेट प्रतिनिधित्व करते. याच्या उलट, सामाजिक आणि आर्थिक निर्णयांचा थेट परिणाम बँकिंग क्षेत्रावर होतो. त्यामुळेच हे क्षेत्र जबाबदारीचे ठरते. या क्षेत्रासाठी निर्णय घेताना सरकार आणि रिझर्व्ह बँक यांना तोलूनमापून निर्णय घ्यावा लागतो. भारतासारख्या देशात बँकिंगच्या निर्णयाचे पडसाद लगेच उमटतात. बँका या अर्थव्यवस्थेच्या नाड्या असतात. बँकिंगच्या माध्यमातून अनेक स्रोत समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचत असतात. यामध्ये सर्वसामान्य नागरिक, उद्योग, वित्तसंस्था या सर्वच घटकांचा समावेश होतो.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## वेळापूर विकास सोसायटीच्या सभासदांना १५ टक्के लाभांश

**सुराज्य/वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस येथील वेळापूर विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या सभासदांना १५ टक्के लाभांशाचे वाटप करण्यात आले. सुरुवातीला सोसायटीचे ज्येष्ठ सभासद पांडुरंग भाऊ माने देशमुख यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यानंतर वेळापूर विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमन व भाजपाचे तालुका उपाध्यक्ष अमरसिंह माने देशमुख यांनी संस्थेचा आढावा घेताना सांगितले की संस्थेने सभासदांना चालू वर्षात ६ कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे. दीवाळी सणासाठी संस्थेच्या सभासदांना २० लाख रुपये लाभांश वाटप करण्यात आला असल्याचे सांगून, सदर संस्था ही महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, सहकार महर्षी शंकराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, आ. रणजीतसिंह मोहिते-पाटील, आ. रामभाऊ सातपुते, मदनसिंह मोहिते-पाटील, धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था कार्यरत असल्याचे सांगितले. यानंतर सहकार महर्षी कारखान्याचे संचालक शंकरराव माने देशमुख, पांडुरंग भाऊ माने देशमुख, अमरसिंह माने-देशमुख व व्हा. चेअरमन महादेव भाऊ ताटे यांच्या हस्ते ज्येष्ठ सभासद पांडुरंग सावंत, दत्तात्रय बनकर, बाळासाहेब घाटगे, आजिनाथ अडसूळ, दशरथ मंडले, भीमराव मेटकरी, श्रीमती पार्वती चंदनशिव, यांच्यासह सभासदांना लाभांशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव भागवत मिले, क्लार्क शिवाजी आडत, संस्थेचे सर्व संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आपदग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी रक्कम मिळावी

**सुराज्य/सोलापूर** : महाराष्ट्रामध्ये गेली दोन महिन्यांपासून पावसाने थैमान घातले आहे. त्या मुळे शेतकऱ्यांचे खुप नुकसान झाले आहे त्या मुळे शेतकरी रस्त्यावर आले आहेत. राज्य सरकारने ताबडतोब शेतकरयाचे बँकेत किंवा रोख रक्कम एकरी ५०००० रूपये ची मदत सरसकट म्हणजे जिल्हा तालुका मंडलनिहाय असा विचार न करता एक गाव किंवा ग्राम खेड की ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यांना न डावलता सर्व आपदग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी मदत मिळावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व रिपब्लिकन अल्पसंख्याक विभाग सोलापूर च्या वतीने एका निवेदनच्या मार्फत सोलापूर उपजिलहाधिरी (महसु) यांना देण्यात आले. या वेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया प्रदेश अधक्ष सुबोध वाघमोडे, जककापा कांबळे, गौस पिरजादे, इजाज शेख, रफिक शेख, सलीम मुल्ला, रावसाहेब परीकक्षाले, मुकुंद काबंळे, मारुती सोनवले, महबूब पठाण, आबुबकर आकरजगीकर, नसरीन शेख, अरूणा सरवदे, नागिणी उबंरजै, रइसा ताबोंळी, सोहेल जहागीरदार, इम्रान शेख, इबराहिम शेख, इजाज शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## वेळापूरचे नूतन प्रभारी पोलीस अधिकारी बागाव यांचा सत्कार

**सुराज्य/वेळापूर** : वेळापूरचे नूतन प्रभारी पोलिस अधिकारी निलेश बागाव यांचा राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग माळशिरस तालुका यांच्या वतीने जि.प. सदस्य बाळासाहेब धाइंजे व तालुका अध्यक्ष रजनीश बनसोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वेळापूरचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील जाधव यांची चांगल्या कामकाजानंतर वेळापुर येथुन बदली होऊन त्या ठिकाणचा पदभार सपोनी निलेश बागाव यांनी स्वीकारला, यावेळी बाळासाहेब धाईंजे, राष्ट्रवादी सामाजिक तालुका अध्यक्ष रजनीश बनसोडे, वेळापूर उपसरपंच जावेद मुलाणी, हनुमंत वायदंडे, दादा गालफाडे, विठ्ठल माने, यासीन शेख, रियाज तांबोळी, रणजीत सरवदे प्रवीण वाघमारे आदी उपस्थित होते.



## देवी भक्तांच्यावतीने उद्योगपती भिसे-पाटील यांचा सन्मान

**सुराज्य/अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील तडवळ व पानमंगरुळ भागात उद्योगपती सुखदेव भिसे-पाटील यांनी बहुसंख्य गावातील नवरात्र तरुण मंडळाला भेट देऊन देवी भक्तगणांची विचारपूस केली. तसेच प्रत्येक गावपातळींवरल नवरात्र महोत्सवात सहभाग होऊन देवी पूजा पार पाडली. यावेळी देवी भक्तगणांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. यावेळी उद्योगपती सुखदेव भिसे -पाटील यांनी म्हैसलगी, मुंढेवाडी, कोर्सेगव, कल्लकर्जाळ, शेगाव, आळगी तडवळ स्टेशन आदी भागात भेट देऊन दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी संतोष रत्नाकर, प्रा. बसवंत गायकवाड, रमेश भतगुणकी, सुभाष बिराजदार, भिमाशंकर बिराजदार, विठोबा भतगुणकी, नागेश भतगुणकी, सागर बिराजदार, शिवानंद भतगुणकी, हणमंत सुरगाळी, विठोबा बिराजदार तसेच विविध मंडळाचे अध्यक्ष, सचिव, प्रतिष्ठित नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणांचा तात्काळ निपटारा करा

### जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

**सुराज्य/सोलापूर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अ‍ॅट्रॉसिटीबाबत अधिनियम १९८९ अंतर्गत पिडीतांना न्याय मिळण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. पिडीतांना अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी शहर आणि ग्रामीण पोलीस विभागाकडे प्रलंबित अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणांचा निपटारा तत्काळ आणि वेळेत करा, अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या.

जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त कैलास आढे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. महाडिक, सपोनि क्षीरसागर, गोविंद आदटराव, अशासकीय सदस्य मुकुंद शिंदे यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी शंभरकर म्हणाले, अनुसूचित



जाती, जमाती अत्याचार (प्रतिबंध) अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. अ‍ॅट्रॉसिटी पिडीत व्यक्तींना न्याय देण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे. यासाठी सर्व विभागांचे सहकार्य आवश्यक आहे. पोलीस विभागाकडील शहर पोलीस आयुक्त कार्यालय १२ तर ग्रामीण पोलीस विभागाकडे ५३ गुन्ह्यांचा तपास प्रलंबित आहे. याचा निपटारा तत्काळ करावा. अ‍ॅट्रॉसिटी समिती सदस्यांची नावे पोलीस ठाण्याच्या नोटीस फलकावर लावण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. न्यायालयीन प्रकरणांवर वेळेत निकाल लागला तर पोलीस विभाग त्यावर कार्यवाही करेल. यासाठी न्यायालयात प्रलंबित शहर पोलीस विभाग ८९ तर ग्रामीण पोलीस विभागाकडील ९४२ अशा १ हजार ३१ प्रकरणांवर निर्णय होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

> **निधी जमा**
>
> अर्थसहाय्याच्या बाबतीत ५ कोटी ६४ लाख ३२ हजार रूपये प्राप्त झाले आहेत. २१३ पिडीतांना ३ कोटी १८ लाख ४० हजार ५०० रूपयांची मदत त्यांच्या थेट बँक खात्यावर वर्ग केली आहे, अशी माहिती समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त कैलास आढे यांनी दिली.

## शुभमंगल कार्यासाठी लागणाऱ्या साहित्यांमध्ये ३० टक्के दरवाढ: हिंगमिरे

### मंगल भांडार असोसिएशनचा निर्णय

**सुराज्य/सोलापूर**

स्टील अन् ॲल्युमिनियमच्या भांडी, फायबर खुर्च्या, मंडप कापड, मजुरीचे दर वाढल्याने मंगल कार्यासाठी लागणाऱ्या साहित्यांमध्ये ३० टक्के दरवाढ करण्याचा निर्णय शहर आणि जिल्ह्यातील मंगल भांडार असोसिएशनने घेतल्याचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांनी सांगितले.



होलसेल दरवाढीचा आर्थिक बोजा मंगल भांडार व्यावसायिकांवर पडत आहे. यावर विचार विनिमय करण्यासाठी १ ऑक्टोबर रोजी बैठक घेण्यात आली. बैठकीस उपस्थित मंगल भांडार व्यावसायिकांची मते जाणून घेतल्यावर अध्यक्ष हिंगमिरे यांनी ३० टक्के दरवाढीची घोषणा केली. कोरोना महामारीच्या काळात तीस महिने हा व्यवसाय बंद होता. त्यातील बहुतांश व्यावसायिक कर्जबाजारी झाले. बँकेच्या कर्जाचे हप्ते थकल्याने वसुलीचा तगादा सुरू झाला. मंगल भांडारवर अवलंबून असलेल्या अनेकांचे रोजगार बुडाले. त्यातून काहींनी आत्महत्या केल्या. आता शासनाने निर्बंधमुक्त केले असले तरी यातील व्यावसायिक आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे विवाह सोहळ्यासाठी लागणाऱ्या साहित्यांमध्ये दरवाढ करण्याचा निर्णय घ्यावा लागला, असे संघटनेचे अध्यक्ष हिंगमिरे यांनी सांगितले.

या बैठकीला संघटनेचे कार्याध्यक्ष अशोक श्रीराम, सचिव मधूकर चिम्मन, सहसचिव जीवन चाबुकस्वार, कोषाध्यक्ष महादेव पाटील, प्रसिध्दी प्रमुख राजेश चिम्मन यांच्याशिवाय सल्लागार समितीचे शशिकांत पाटील, राजेंद्र बिराजदार, विनायक पाटील, सचिन भिसे, रामकृष्ण पोरे अजहर पठाण आदी उपस्थित होते.

## जुना पुणे नाक्याजवळ प्रवाशास मारहाण

**सुराज्य/सोलापूर** : बस स्थानकातून जुना पुणे नाका येथे रिक्षातून उतरून पायी जाताना दुचाकीवरून आलेल्या चौघा अनोळखी इसमानी लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत मोहन अनिल गवळी (वय ३८ रा. नान्नज ता. उत्तर सोलापूर) हे जखमी झाले. ही घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली.

**नाझरे येथे ६५ हजारांची घरफोडी**

नाझरे (ता. सांगोला) येथे राहणाऱ्या गणेश शिवानंद मसळी यांच्या बंद घराचा कडी कोयंडा तोडून चोरट्याने कपाटातील ५ हजार रुपये रोख आणि २० ग्रॅम सोन्याचे दागिने असा ६५ हजाराचा ऐवज पळविला. ही चोरी मंगळवारी पहाटेच्या सुमारास झाल्याची नोंद सांगोला पोलिसात झाली.

## पार्क स्टेडियम ओपन टुर्नामेंटला भाडे तत्त्वावर देण्यास टाळाटाळ

**सुराज्य/सोलापूर**

इंदिरा गांधी पार्क स्टेडियम ओपन टूर्नामेंटला भाडेतत्त्वावर देण्यास टाळाटाळ करीत असल्याची माहिती टूर्नामेंटचे प्रशांत बाबर यांनी पत्रकार परिषदेत दिली. पार्क स्टेडियम क्रिकेटसाठी भाडेतत्त्वाने मिळावे म्हणून महापालिकेकडे भाडे ॲडव्हान्स रक्कम भरली होती मात्र महापालिकेने पार्क स्टेडियम देण्यास टाळाटाळ करीत आहे, असे प्रशांत बाबर यांनी सांगितले

पार्क स्टेडियमची जागा ही शासकीय दराप्रमाणे ६६ हजार रुपये भरून ॲडव्हान्स बुकिंग केले होती. मात्र महापालिका प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी करूनही ते दिली नाही. महापालिकेकडून मुख्यमंत्र्यांचा सोलापूर दौरा निश्चित झाल्यानंतर तारीख कळविण्यात येईल असे असे सांगितले जात आहे. स्टेडियम चे मैदान खेळाडू पासून वंचित ठेवले आहे, अशी तक्रार बाबर यांनी केली.

> **पार्क मैदान लवकरच सुरू करू : आयुक्त**
>
> पार्क मैदानाचे काम पूर्ण झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्याचे नियोजन आहे. त्यांची वेळ घेण्यात येणार आहे. लवकरच याचे उद्घाटन होईल, असे पालिका आयुक्त शिवशंकर यांनी सांगितले.

स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कंपनीकडून पार्क मैदान सुसज्ज करण्यात आले आहे. मात्र सहा महिने तयार झाले असून तरीदेखील अद्यापही एकही अधिकृत स्पर्धा येथे पूर्ण झाली नाही क्रिकेट खेळाडूंना खेळण्यासाठी मैदान सरावासाठी खेळपट्टी व इतर साहित्य उपलब्ध झालेले नाही. महापालिका क्रिकेट विरोधी काही लोकांना हाताशी धरूप जाणून बघून ही स्पर्धा न देण्याचा घाट घालत असल्याचा आरोप बाबर यांनी केला. यावेळी विशाल कुलकर्णी उपस्थित होते.

## माढेश्वरी मंदिर परिसरातील जगदाळे यांचे उपोषण तीन दिवसानंतर मागे



**सुराज्य/माढा**

माढ्यातील माढेश्वरी देवी अन्यत्र मंडळाचे सचिव मारूती जगदाळे यांनी माढेश्वरी मंदीर परिसरात ९ ऑक्टोबर पासून सुरू केलेले प्राणांतिक उपोषण अखेर लेखी आश्वासनानंतर ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी मागे घेण्यात आले.

माढेश्वरी देवीच्या मालकीच्या असणार्या बावी येथील जमिनीतून बेकायदा मुरूम उपसा केल्याप्रकरणी या विषयाशी संबंधित असणार्यावरती गुन्हे दाखल करण्याच्या प्रमुख मागणीसाठी ते उपोषणास बसले होते. ऐन यात्रेच्या कालावधीत आणि पडत्या पावसातही जगदाळे यांचे सलग तीन दिवस उपोषण सुरू होते. या विषयाला अनुसरून देवस्थानचे विश्वस्त यांच्यावर कारवाई करण्याची त्यांची प्रमुख मागणी होती. याचबरोबर गेल्या वीस वर्षापासून मंदिराचे लेखापरीक्षण करण्यासही वज्रलेप करताना शासनाची परवानगी आणि मंदिराच्या कारभाराची चौकशीची मागणी त्यांनी केलेली होती. दरम्यान उपोषणस्थळी रावरंभा निंबाळकरांचे वंशज व भूम ता परांडा येथील रहिवासी माजी नगराध्यक्ष विजयसिंह थोरात यांनी जगदाळे यांची भेट घेतली. घटस्थापनेच्या दिवशीची खंडीत परंपरा पुन्हा सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

> जगदाळे यांनी केलेले आरोपात कोणतीही सत्यता नाही. देवस्थानच्या मालकीच्या जमिनीतून मुरूम उपसा प्रकरणी त्याचवेळी जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयास मी लेखी तक्रारी केल्या आहेत.
>
> **-ॲड. उदय पुजारी,** विश्वस्त माढेश्वरी मंदीर

> माढेश्वरी देवस्थानाच्या बावी येथील जमिनीतून मुरूम उपसा झाला अथवा नाही यासाठी पंचनामे करण्यात येतील. चौकशी करून दोषी आढळल्यास दोषींवर निश्चितच कारवाई करण्यात येईल.
>
> **- राजेश चव्हाण,** तहसीलदार

## बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याचा संघ रवाना

**सुराज्य/सोलापूर** : गोंदिया येथे होणाऱ्या ४ थी सब ज्युनिअर राज्यस्तरीय महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हाचा संघ जाहीर करण्यात आला. द सोलापूर शहर व जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने पार्क मैदानावर झालेल्या निवड चाचणीतून सोलापूर जिल्हांचा संघ निवडण्यात आला असून हा संघ राज्य स्पर्धेसाठी रवाना झाला आहे. या निवड झालेल्या खेळाडूंना अध्यक्ष प्रकाश भुतडा, सचिव राजेंद्र माने, सहसचिव सुहास छंचुरे, उपाध्यक्ष अजित पाटील, प्रा. प्रमोद चुंगे, प्रसन्न काटकर सचिन गाडेकर, रणजित लोहार, चंद्रकांत रेम्बसु, बाळासाहेब भास्कर, अक्षय माने, शब्बीर शेख, स्वामी यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

मुलांचा संघ पुढील प्रमाणे : प्रसाद मोरे. कर्णधार, ऋषिकेश चव्हाण, अजिंक्य मोरे, शुभम जावळे, सार्थक शिंदे, सार्थक जाधव, विश्वजीत यादव, ओम ढोबळे, सुमित दुधाळ. (सर्व मंगळवेढा)प्रशिक्षक. राजेंद्र माने संजय व्यवस्थापक. नितीन मोरे शहाजी ढोबळे यांचा समावेश आहे.




## महिलांच्या सुप्त कलागुणांना वाव : व्हट्टे

**सुराज्य/अक्कलकोट** : महिलांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी अम्मा सुवर्णा लक्ष्मी फाउंडेशन ने हा एक मंच तयार करून दिला आहे हे काम खरोखर कौतुकास्पद आहे असे मत अम्मा सुवर्णा लक्ष्मी फाउंडेशन ने आयोजित केलेल्या दांडिया महोत्सवाच्या उद्घटना प्रसंगी जोडभावी पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर मनिषा माळशेट्टी, जिल्हा परिषद महिला बालकल्याण माजी सभापती स्वातीताई शटगार, अम्मा सुवर्ण लक्ष्मी फाउंडेशनच्या अध्यक्षा लक्ष्मीताई सिध्दाराम

म्हेत्रे, काँग्रेस महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षा शितलताई सिध्दाराम म्हेत्रे, इंडियन मॉडेल स्कूलच्या मुख्याध्यापिका गौरी दातार मॅडम उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

अम्मा सुवर्णा लक्ष्मी फाऊंडेशनच्या माध्यमातून अक्कलकोट शहर व तालुक्यातील महिलांसाठी वेगवेगळ्या पध्दतीच्या उपक्रमाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याचे काम करणार असे मत अम्मा सुवर्ण लक्ष्मी फाउंडेशनच्या अध्यक्षा लक्ष्मीताई सिध्दाराम म्हेत्रे बोलताना म्हणाल्या. दांडिया महोत्सवाचे आयोजन वयोगट दहा ते वीस (किशोरी गट), वयोगट वीस ते तीस (तरूणी गट) व वयोगट तीस च्या पुढील (खुला गट) अशा तीन गटात करण्यात आला होता.

**विजेत्यांची नावे :** १. उत्कृष्ट वेशभूषा - साक्षी हिंडोळे, अर्पिता चव्हाण, प्रियांका अजगुंडे २. उत्कृष्ट नृत्य - राणी कुंभार, भक्ती धरणे, सलोनी शहा या सर्व विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली पडवळकर यांनी केले.

# शासकीय कार्यालयात ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाची स्थापना करा

### जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या सूचना

### ज्येष्ठ नागरिक समन्वय सनियंत्रण समितीचा जिल्हास्तरीय आढावा

**सुराज्य/सोलापूर**

प्रत्येक शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाची स्थापना त्वरित करा, अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या.



जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय सनियंत्रण समितीची जिल्हास्तरीय आढावा बैठक समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झाली. या बैठकीला समाज कल्याणचे सहायक आयुक्त कैलास आढे, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, सदस्य ज्येष्ठ नागरिक हनुमंत कुंभार यांच्यासह जिल्ह्यातील गटविकास अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये ज्येष्ठ नागरिकांना शासन पुरवित असलेल्या सुविधांबाबत माहिती देण्यात आली. खाजगी रूग्णालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव बेडची व्यवस्था करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार उपजिल्हा रूग्णालयात २ बेड राखीव ठेवण्यात आले आहेत. यापध्दतीने खाजगी दवाखान्यातही बेड राखीव ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिल्या.

ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा कक्षाची स्थापन महापालिका, नगरपालिकेने, ग्रामपंचायतीने स्थानिक निधीतून तयार करावेत. ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा आणि अडीअडचणीबाबत वेळेत कार्यवाही करणे याबाबतही चर्चा झाली. ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाच्या माध्यमातून ज्येष्ठांना न्याय द्यावा. त्यांचे प्रश्न, तक्रारी या सोडविण्याची मागणी सदस्य हनुमंत कुंभार यांनी केली.

> **शासकीय कार्यालयात ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष**
>
> प्रत्येक शासकीय कार्यालयात ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाची स्थापना करण्याची मागणी ज्येष्ठ नागरिक संघाने केली होती. यावर कारवाई सुरू असून जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय आणि गटविकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी याठिकाणी सहायता कक्षाची स्थापना झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. उर्वरित कार्यालयात सहायता कक्षाची स्थापना त्वरित करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिल्या.

# शेतकऱ्यांची दिवाळी गोड करणार : महाडिक

## गळीत हंगामाचा उत्साहात शुभारंभ

✔ सुराज्य/विरवडे

अनेक अडचणींचा सामना करत असताना संचालक मंडळाच्या कारभारावर विश्वास ठेवून भीमाच्या सभासदांनी आम्हाला अतिशय चांगली साथ दिली आहे. येणारा सुवर्णकाळ हा सभासदांच्या हिताचा असल्याचे सांगत गळीत हंगाम २०२१-२२ ला गळीतास आलेल्या उसाला अतिरिक्त बिलापोटी १०० रुपये प्रति टन देणार असून यातील ५० रुपये व गळीत हंगाम २०१८-१९ मधील ५० रुपये दिवाळीच्या अगोदर देणार असल्याचे कारखान्याचे चेअरमन तथा खासदार धनंजय महाडिक यांनी जाहिर केल्याने यंदा भिमाच्या सभासदांची दिवाळी गोड होणार असल्याचे शेतकऱ्यांमधून ऐकावयास मिळत होते.

टाकळी सिकंदर (ता. मोहोळ) येथे भीमा सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ चेअरमन धनंजय महाडिक, व्हाईस चेअरमन सतीश जगताप, कार्यकारी संचालक सूर्यकांत शिंदे, विश्वराज महाडिक, पवन




महाडिक, विजय महाडिक, शंकर वाघमारे, सुरेश सावंत, शिवाजी गुंड, विक्रम डोंगरे, शैला गोडसे व पाच ज्येष्ठ सभासद मच्छिंद्र टेकळे (पापरी), हरिभाऊ चवरे (पेनुर), अंबादास भोसले (अंकोली), पंडित बाबर (पुळुज), दिलीप चव्हाण (टाकळी सिकंदर) यांच्या शुभहस्ते गव्हाणीत उसाची मोळी टाकून करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

प्रारंभी विधिवत पूजा करून वजन काटा, बैलगाडी व ट्रॅक्टर ट्रॉली ची पूजा करून कारखान्याचे संस्थापक स्व. भीमराव दादा महाडिक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीचे पैसे मिळावे यासाठी आपण को-जन प्रकल्प कार्यान्वित केल्याने त्यामधून लाखो रुपयांचे उत्पन्न आपल्याला मिळाले. येणाऱ्या काळात इथेनॉल प्रकल्प उभा करण्याचा मानस असल्याने याचा फायदा शेतकऱ्यांना होणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान गतवर्षाच्या गाळपास आलेल्या ऊसाला १०० रुपये जाहीर केल्याने शेतकऱ्यांमधून टाळ्या आणि शिट्ट्या वाजून आनंद व्यक्त करण्यात आला.

गेल्या दोन वर्षात गळीतास आलेल्या उसाला पहिल्या २-३ महिन्याचे बिल वेळेवर मिळाले मात्र शेवटच्या कालावधीत गाळप झालेल्या उसाचे बिल देण्यास आम्हाला विलंब झाला अशी कबुली देत यंदा असा कसलाच प्रकार होणार नाही. शेवटच्या गाडीचे, वजन काट्याचे पूजन करण्याच्या दिवशी शेवटच्या गळीतास आलेल्या उसाचे बिल अदा करण्यात येईल असा शब्द चेअरमन धनंजय महाडिक यांच्या साक्षीने सतीश जगताप यांनी दिल्याने या निर्णयाचे स्वागत सभासदांनी टाळ्या वाजून केले.

यावेळी कार्यालयीन अधिक्षक भाऊसाहेब जगताप, भाजपा तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, पांडुरंग ताटे, राजाराम बाबर, भारत पाटील, झाकीर मुलाणी, माऊली भगरे, अमोल व्यवहारे, संतोष सुळ, राहुल व्यवहारे, शरद लोकरे, छगन पवार, लिंगराज शेंडगे, युवराज चौगुले, जमीर मुजावर यांच्यासह सर्व संचालक मंडळ, विभाग प्रमुख, कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवक्ते पांडुरंग ताटे यांनी केले.




## एमआयटीत शेलार मामा जीवनदर्शन प्रदर्शनीचे उद्घाटन

✔ सुराज्य/पुणे : सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रात शेलारमामांनी केलेल्या अमूल्य योगदानाचे महत्व, योगासनात केलेले प्रयोग व विविध क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा सर्व स्तरातील नागरिकांना होणे गरजेचे आहे. त्यांचे जीवनचरित्र सर्व मानव जातीचे कल्याण करतील. यासाठी ही प्रदर्शनी महत्वाची आहे. असे विचार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांनी व्यक्त केले. थोर स्वातंत्र्यसेनानी ह.भ.प. संत. श्री. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या १६ व्या पुण्यतिथी निमित्त स्वातंत्र्य सेनानी ह.भ.प. संत. श्री. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा योग संशोधन सेवा प्रतिष्ठान, पुणे आणि माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहतर्फे कोथरूड येथील विद्यापीठाच्या संतश्री ज्ञानेश्वर सभागृहात शेलारमामा यांची जीवनदर्शन प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. दोन दिवसीय ही प्रदर्शनी १३ ऑक्टोबर पर्यंत सर्वांना पाहण्यासाठी निःशुल्क ठेवण्यात आली आहे. या वेळी पं. वसंतराव गाडगीळ, शरदचंद्र दराडे पाटील, डॉ. टी. एन. मोरे, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, कुलसचिव डॉ. प्रशांत दवे, दुरदर्शनचे माजी संचालक मुकेश शर्मा, डॉ. मिलिंद पात्रे आणि निरंजन खैरे उपस्थित होते. या प्रदर्शनीत शेलार मामांनी स्वातंत्र्य संग्रमात सहभागी झाल्या संदर्भातील फोटो, चिलखत, गुप्ती, विविध संस्थाकडील पुरस्कार, गौरव चिन्ह, गोवा मुक्ती संग्राममध्ये सहभागी झाल्यामुळे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेल्या ताम्रपट, भीष्माचार्य व चिंतामणी पुरस्कार, शाहु आंबेडकर पुरस्कार, अमरावती विद्यापीठाद्वारे देण्यात आलेले पुरस्कार असे ४२ पुरस्कार ठेवण्यात आले आहे. त्याच प्रमाणे, पुस्तके, जीवन चरित्र, त्यांच्या संदर्भात वर्तमान पत्रात प्रकाशित झालेले कात्रणे व लेख सुध्दा येथे पहावयास मिळणार आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचे ते गुरू होते. शेलार मामांचे कार्य तरूण पिढी पर्यंत पोहचविण्यासाठी हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.




## जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने भाविकांसाठी मोफत औषधे

✔ सुराज्य/बार्शी : सालाबादप्रमाणे याही वर्षी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजापुरला चालत जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने मोफत औषध सेवेचे आयोजन केले होते. हे प्रतिष्ठानचे ११ वे वर्ष आहे. बार्शी तालुक्यातील उपळे दुमाला येथील गणपती मंदिरामध्ये करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून हजारो भाविक भक्तांना जय शिवराय प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या वतीने मोफत औषध सेवेचा लाभ देण्यात आला यामध्ये वेदनाशामक गोळ्या, क्रीम, स्प्रे व जखमेवरील पावडर त्याचबरोबर अशक्तपणावर एनर्जी ड्रिंक व इतर औषध सेवा प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या माध्यमातून सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत देण्यात आली. यामध्ये थकलेल्या, दमलेल्या असंख्य भाविक भक्तांची सेवा जय शिवराय प्रतिष्ठानच्या सदस्यांकडून करण्यात आली. या सेवेमुळे भाविक भक्तांच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता ही खूप काही सांगून जात होती.

## लिंबू महागला, वांगी, काकडी स्वस्त

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून बुधवार, १२ ऑक्टोबर रोजी



मिळालेल्या माहितीनुसार लिंबू महागला तर वांगी, काकडी स्वस्त झाली. यामध्ये ढोवळी मिरची, गवार, चाकवत, हिरवी मिरची, अंबाडी भाजी यांचे दर प्रतिक्विंटल २०० ते हजार रूपयेने कमी झाले.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ४,५०० | ८,५०० | ६,००० |
| कारली | १,२०० | २,४०० | २,००० |
| वांगी | ६०० | ४,००० | २,००० |
| कोबी | ६०० | १,४०० | १,००० |
| ढोवळी मिरची | ६०० | २,००० | १,५०० |
| गाजर | १,००० | १,६०० | १,४०० |
| गवार | १,००० | ५,५०० | २,५०० |
| कोथिंबीर | ४०० | ९०० | ७०० |
| काकडी | ५०० | १,२०० | ८०० |
| फ्लॉवर | ५०० | १,८०० | १,००० |
| लसूण | ९०० | २,८०० | १,७०० |
| घेवडा | ३,५०० | ४,५०० | ४,००० |
| हिरवी मिरची | १,००० | ३,५०० | २,५०० |
| अंबाडी भाजी | ३०० | ३०० | ३०० |
| बटाटा | ८०० | २,२०० | १,८०० |
| लिंबू | २,००० | ५,४५० | ४,००० |
| तांदूळ | ३,००० | ६,३६० | ३,८०० |
| दोडका | ५०० | ३,५०० | २,५०० |
| शेपू | ४०० | ७०० | ६०० |
| पालक | ३०० | ५०० | ४०० |
| टोमॅटो | ५०० | ३,५०० | १,६०० |
| गहू | २,२८५ | ३,३२५ | २,७८० |



## पुस्तकांमुळे जीवन परिर्वतन होते : डॉ. शिंदे

✔ सुराज्य/सोलापूर

पुस्तक वाचन सतत करत रहा, क्रमिक पुस्तकाशिव इतर पुस्तकांचे वाचनांने जीवनात पारिवर्तन होत असते, किताबें रास्ता बताती हैं, जीना सिखाती हैं, म्हणून प्रत्येक भाषांच्या पुस्तके वाचन सतत करण्याचा सल्ला पुण्यश्लोक अहिल्या बाई होळकर विद्यापीठाचे उप कुल सचिव मा डा. शिवाजी शिंदे यांनी दिला. ते सोशल महाविद्यालयात उर्दू विभाग आयोजित डा. शफी चोबदार, डा. फरजाना शेख संपादित पुस्तक मुन्तखब गज़लों और नज़्मों की तल्खीस प्रकाशन प्रसंगी बोलत होते. अध्यस्थानी प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अभा मराठी मुस्लीम साहित्य परिषदचे सचिव अय्यूब नल्लामंदू, डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. राजगुरु, डॉ. फरजाना डॉ. मुल्लां उपस्थित होते. उर्दू विभाग प्रमुख डा. चोबदार यांनी प्रास्ताविक व स्वागत केले, डा. फरजाना शेख यांनी पुस्तका विषयी भाष्य केले आणि डॉ. जे. एन. मुल्लां, अय्यूब नल्लामंदू, प्राचार्य इ. जा. तांबोळी यांनी मनोगत व्यक्त करत शुभेच्छा व्यक्त केल्या. सूत्रसंचलन डॉ. तस्नीमां वड्डो, यांनी केले तर आभार डॉ. जी. एन. शेख यांनी मानले.

## महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी बेमुदत संपावर जाणार : डॉ. सिंग

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यातील महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्य झालेली कालबध्द व आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाची मंजुरी घेतली नाही या तांत्रिक कारणामुळे रद्द केली. ती पुन्हा सुरू करणेबाबतची मागणी उच्च व तंत्र शिक्षण आणि वित्त विभागाकडे गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी याबाबत लवकरच एक बैठक आयोजित करून हा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन दिले आहे. या बैठकीत ही मागणी मान्य झाली नाही तर राज्यातील महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस डॉ. आर. बी. सिंग यांनी दिला आहे.

कल्याण येथे महासंघाचे अध्यक्ष राजा बढे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही मागणी प्रलंबित असल्यामुळे सातवा वेतन आयोग लागू होऊनही या कर्मचाऱ्यांचे वेतन न वाढता वेतन वसुली होणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हा युनियनने आपापल्या जिल्ह्यातील आमदार व पालकमंत्री यांना निवेदन देऊन बेमुदत संपावर जाणार असल्याचे सूचित करावे, असे आवाहन त्यांनी उपस्थित सर्व सदस्यांना केले.

यावेळी महासंघाचे कार्याध्यक्ष शशिकांत कामटे, उपाध्यक्ष राजेंद्र गोटे, विभागीय सचिव अजितकुमार संगवे, सोलापूर कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, खजिनदार राहुल कराडे, माजी सरचिटणीस विठ्ठल कोळी, महेश सुरवसे आदी उपस्थित होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अधीसभेवर पदवीधर मतदार संघातून निवडून आलेले विभागीय सचिव श्री. संगवे यांचा सत्कार करण्यात आला.

## डॉ. मस्के, उपनगराध्यक्षा जगदाळेंचा आंतरराज्य पुरस्काराने सन्मान

✔ सुराज्य/माढा

माढ्यातील मित्रप्रेम मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाचे डॉ विकास मस्के आणि नगरपंचायती च्या उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे यांना बेळगाव (कर्नाटक) येथे आंतरराज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून या दोहोंचे माढा शहर व तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे.

महाराष्ट्र कर्नाटक व गोवा राज्यातून उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरवण्यात येते. आंतरराज्य स्तरावरील या पुरस्काराने डॉ विकास मस्के आणि कल्पनाताई जगदाळे यांच्या कार्याचा मोठा सन्मान झाल्याचे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे.

उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे यानी जगदाळे फौंडेशन च्या माध्यमातून आपल्या प्रभागातून मुलगी वाचवा अभियान





राबवले. यासाठी मुलींच्या जन्माचे स्वागत करताना त्यांच्या नावे कायमस्वरूपी ठेव ठेवण्यात आली.

याच बरोबर महिला बाल कल्याण समितीचे सभापतीपद तसेच सध्या उपनगराध्यक्ष पदी काम करताना परिसराचे सुशोभीकरण रमाई आवास योजना पंतप्रधान आवास योजना आदि प्रभावीपणे राबवल्या आहेत. आपल्या जगदाळे फौंडेशनचे माध्यमातून पती तथा अध्यक्ष शिवाजीराव जगदाळे यांच्या सहकार्याने सर्व गरजूंना सर्वतोपरी मदत त्यांनी केली आहे. याच सामाजिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. याच सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले. या पुरस्कार वितरण प्रसंगी कर्नाटक राज्याचे माजी मुख्यमंत्री विरप्पा मोईली गोव्याचे माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर माजी केंद्रीय मंत्री श्रीमती रत्नमाला सावनूर आमदार निलेश लंके खासदार आनंदराव अडसूळ कोल्हापूरचे माजी महापौर राजू शिंगाडे बेळगावचे खासदार अमरसिंह पाटील पोलीस अधिक्षक महेश मेघ्गणार जगदाळे फौंडेशनचे अध्यक्ष शिवाजी जगदाळे डॉ तनिश्का दादासाहेब साठे यांच्या उपस्थितीत एका शानदार कार्यक्रमात पुरस्कार वितरण संपन्न झाले. या पुरस्काराबद्दल माढा तालुक्याचे माजी आमदार धनाजीराव साठे कॉंग्रेसचे नेते दादासाहेब साठे नगराध्यक्षा मिनलताई साठे सर्व सभापती व नगरसेवकांनी अभिनंदन केले आहे.



## आनंदराव देवकते यांची पुण्यतिथी साजरी

✔ सुराज्य/सोलापूर : वडजी (ता. द. सोलापूर) आनंदरांव देवकते प्रशालेत स्व. आनंदराव देवकते यांच्या पुण्यस्मरण दिनामित्त प्रशालेत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रशालेचे मार्गदर्शक विश्वास गजबार, मुख्याध्यापक कल्याण गजबार, शाळा विभाग प्रमुख श्रीमंत हक्के, कांबळे, भिमन्नवरु, निचळ, चिवरे, क्षिरसागर यांच्यास तसेच शिक्षकेतर कर्मचारी विदयार्थी आदी उपस्थित होते. यावेळी विश्वास गजबार यांनी देवकते यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली.

## अकलूज परिसरात परतीचा मुसळधार पाऊस

✔ सुराज्य/अकलूज

अकलूज आणि परिसरात परतीच्या पावसाने मुसळधार पध्दतीने हजेरी लावली. बुधवारी सकाळपासून सुरुवात झालेल्या या पावसाने दुपारीच विश्रांती घेतली पण ढगाळ वातावरणाने अनेकांनी घरीच थांबणे पसंत केले त्यामुळे जनजीवन विस्कळित झालेले दिसले.




अकलूज परिसरात गेले दोन दिवस मधून अजून पावसाच्या सरी तर आज बुधवारी सकाळी सात वाजले पासून दुपारी दोन वाजेपर्यंत कमी अधिक प्रमाणात परतीच्या पावसाने दमदार हजेरी लावली या पावसामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याची अडचण झाली सध्या परीक्षा चालू आहेत तर कामगारांना कामावर जाण्याची ही मोठी तारांबळ झाली नेहमीप्रमाणे अकलूज मधील सदुभाऊ चौक शिवशंकर बाजार येथे पाणी तुंबल्याने काही काळ वाहतूक खोळंबली तर ओढ्याकडच्या घरांमध्ये पाणी शिरले अनेक व्यापारी संकुलामध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांच्या मालाचे नुकसान झाले तर सकाळी भाजीपाला निलावामध्ये भाजीपाला विक्रेत्यांना मोठा फटका बसला दुपारी पाऊस उघडल्यावर थोडीफार विक्री झाल्याचे भाजीपाला विक्रेत्यांनी सांगितले माळशिरस तालुक्यात पाच साखर कारखाने आहेत सर्व साखर कारखान्याचे धुराडे पेटले असून येत्या दोन-तीन दिवसात ऊस गळीत हंगाम सुरू होणार आहे त्यासाठी ऊसतोड मजूर कारखाना स्थळावर आले असून पावसामुळे त्यांची तारांबळ झाली कारखान्यांनी तात्पुरती सोय केले आहे पाऊस उघडला नाही तर कारखान्याचा गळीत हंगाम लांबणीवर पडेल आणि ऊस तोडणी अडचण येणार आहे. शेतामध्ये खरीप हंगामातील बाजरी मका सोयाबीन पीके काढणीस आलेले आहेत.

पावसाचा मोठा फटका या पिकांना बसणार असून विशेषतः सोयाबीन चे पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसत आहे फुल शेतीमध्ये झेंडूच्या फुलांमध्ये पाणी गेल्याने सर्व फुले नासुन जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे खरे तर बैलपोळ्यानंतर रब्बी हंगामाला सुरुवात होते परंतु दसरा गेला दिवाळी आली तरीही रब्बी ज्वारी किंवा इतर पिकांचे पेरण्या झालेल्या नाहीत त्यामुळे रब्बीचा हंगाम लांबणीवर पडेल अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

पत्ता : इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

जा.क्र.नअ/भूवमा/७५१ **भूमी व मालमत्ता यांचे कार्यालय** दि. १२/१०/२०२२

### प्रथम मुदतवाढ

सोमपा भूमी व मालमत्ता विभागाकडील खुली जागा पे अ‍ॅन्ड पार्कसाठी भाडेतत्वावर देणेकामी (१) होम मैदान-१, (२) होम मैदान-२, (३) हुतात्मा बाग रेवणी मारुतीजवळ, (४) लक्ष्मी मार्केट मंडई येथील फेर ई-निविदेस आवश्यक प्रतिसाद प्राप्त न झाल्याने सदर ई-निविदा भरणेसाठी दि. ११/१०/२०२२ ते १९/१०/२०२२ अखेर दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे.

१) Tender ID - 2022_SMC_838139_1 | ३) Tender ID - 2022_SMC_838147_1
२) Tender ID - 2022_SMC_838141_1 | ४) Tender ID - 2022_SMC_838149_1

या कामाचे टेंडर शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ११/१०/२०२२ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/- **सहा आयुक्त (मालमत्ता)**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM TENDER NOTICE

| Sr. No. | Tender No. | Tender Detail | Tender/ Enquiry RFX Number | Amount in Rs. | EMD | Tender Fee | Tender Publication Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/EHV/ O&M/SUR/ SRM/T-17/ 2022-23 | SRM Tender for the work of creation of new earthing pit and renovation of existing old earth pit at various EHV Substations under jurisdiction of EHV O & M Division, Solapur. | **RFX No:- 7000024897** | Rs. 10,00,000/- Including Taxes. | Rs. 10,000/- | Rs. 525/- including GST | From Dt. 11.10.2022 @ 09:00 Hrs To Dt.19.10.2022 up to 23:00 Hrs |
| 2 | EE/EHV/ O&M/SUR/ SRM/T-13/ 2022-23 | SRM RE-Tender for the work of providing and fixing of oil temperature indicator & winding temperature indicator for power Transformers/ICT's available at 220/132kV Substation under jurisdiction of Trans O & M Division, Solapur. | **RFx No.: 7000024573 (IInd CALL)** | Rs. 10,00,000/- Including Taxes. | Rs. 10,000/- | Rs. 525/- including GST | From Dt. 11.10.2022 @ 09:00 Hrs To Dt.19.10.2022 up to 23:00 Hrs |

For more details, please visit SRM website: **www.mahatransco.in** or **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Details:** Addl, Executive Engineer- (Mob.) 7447441096
Dy. Executive Engineer-(Mob.)7447441043

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV O&M Division, Solapur**

# डाळिंबाचा 'कॅलिफोर्निया व्हेंटिलेटरवर'

## गतवैभव प्राप्तीसाठी संशोधनाची गती वाढविण्यासह खात्रीशीर उपाययोजनांची गरज

सुराज्य/शिवाजी हळणवर



एकेकाळी संपूर्ण देशाला दिशादर्शक ठरलेली, राज्यातील डाळिंब शेती बहुपदरी संकटात आहे. गत दोन वर्षापासून बदलत्या वातावरणातून तेलकट, कुजवा, पीन होल बोअर आणि मर, अशा संकटांची तीव्रता वाढल्याने डाळिंबांचे अर्थकारण पुरते कोलमडले असून कोरडवाहू शेतकऱ्यांचे अस्तित्वच पणाला लागले आहे. विशेषता अवर्षणप्रवण भागातील शेतकरी आणि शेतमजुरांची खात्रीशीर उत्पन्नाच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्यासह समृध्दी घडवून आणणाऱ्या, किंबहूना महाराष्ट्राचे नाव देशासहसातासमुद्रांपलिकडे पोहचविणाऱ्या डाळिंब शेतीची सुरू असलेली परवड थांबण्याची सुतराम शक्यता नाही असेच चित्र दिसत आहे.

### डाळिंब शेतीचा सुवर्णकाळ

महाराष्ट्रात १९७२ च्या दुष्काळानंतर पिकाऊ पडीक जमीन लागवडीखाली आणणे, ज्वारी, बाजरीसारख्या पारंपारिक कमी मूल्य देणाऱ्या पिकांकडून अधिक मूल्य देणाऱ्या पिकांकडे वळणे आणि ग्रामींण भागातील रोजगाराच्या संधीतून लहान आणि सीमांत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे या भूमिकेतून दुष्काळ सहनशील पिकांचा विचार पुढे आला. अर्थात १९८१ - ८२ मध्ये राज्य सरकारने बागायती पिकांसाठी भांडवली अनुदान योजना सुरू केली होती. त्यानंतर १९९१ मध्ये स्थानिक निकड, लोकसहभाग त्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम या त्रिसुत्रीवर आधारित रोजगार हमी योजनेशी निगड़ीत फळबाग लागवड योजना कार्यान्वित केल्यामुळे कोरडवाहू,पडीक नापीक जमिनीला डाळिंबाच्या माध्यमातून नवसंजीवनी मिळाली ज्यातून डाळिंब शेती गावोगावी विस्तारली. विशेषता कमी पाण्यात, कमी खर्चात आणि राज्यांतील रखरखीत माळरानावर डाळिंब पीक वाढण्याच्या अफाट क्षमतेमुळे देशाच्या डाळिंबाच्या एकूण क्षेत्रापैकी ६५ टक्के क्षेत्र आणि ७० टक्के उत्पादनासह महाराष्ट्राने दैदिप्यमान प्रगती साध्य केली आहे. पुढे डाळिंबाचा राज्यात केलेला फलोत्पादनाचा प्रयोग राष्ट्रीय फलोत्पादन अभियान म्हणून अवघ्या देशाने स्वीकारला. देशामध्ये सन २००६-०७ ते २०१८-१९ या काळामध्ये डाळिंबाखालील क्षेत्र १ लाख २० हजार हेक्टरवरून २लाख ८२ हजार वाढले आहे तर उत्पादन ८.४ ते ३४ लाख मेट्रीक टन वाढले आहे. तर दर हेक्टरी उत्पादकता ६.४६ वरून सुमारे १२.७१ मेट्रीक टन म्हणजे ( दुप्पट ) वाढ झाली. विशेष म्हणजे क्षेत्र व उत्पादकता दुप्पट तर उत्पादनात तिप्पट वाढल्याचे दिसते. विशेषता शेतकऱ्यांनी बाजारपेठेनुसार निर्यातक्षम डाळिंब उत्पादनाचे तंत्र अवगत करून महाराष्ट्राचे नाव देशासह जगात पोहचविले. निश्चितपणे ग्रामीन भागाचा चेहरामोहरा बदलविणारा, किंबहूना सामाजिक शैक्षणिक व अर्थिक समृध्दींच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारा ठरला आहे.

### डाळिंबाचा कॅलिफोर्निया व्हेंटिलेटरवर

ऋषीतुल्य नेतृत्व स्वर्गीय आ.गणपतराव देशमुखांचा 'दुष्काळी'तालुका म्हणून ओळख असलेल्या सांगोल्याची शेती एकेकाळी केवळ पारंपारिक पीकांवर तर उदरनिर्वाह मोल मजूरींवर अवलंबून होता. मात्र दुष्काळातही डाळींबाच्या अर्थक्रांतीने येथील शेतकरी आणि शेतमजुरांच्या जीवनात आर्थिक समृध्दी आणली आहे, येथील शेतजमीन डाळिंबपुरक ओळखून कृषी पदवीधर असलेल्या प्रभाकर चांदणे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सर्वात प्रथम १९७४ साली या भागात डाळिंबाची लागवड केली. त्यांचा हा यशस्वी प्रयोग पाहून बाबुराव गायकवाड, सुरेश बेले, नामा भोसेकर, साहेबराव ढेकळे, कोंडिबा सिद आणि रामचंद्र जाधव यासारख्या कृषी क्षेत्रातील शिलेदारांनी अपार कष्ट व निष्ठेतुन डाळिंब शेतींचे बारकावे समजून घेत माळरानावर डाळिंबाचे नंदनवन फूलविले.

तसेच एकमेकांच्या सहकार्याने डाळिंब लागवड, व्यवस्थांपण, मार्गदर्शन, अनुदान, अशा सर्वच पातळीवर प्रयत्नासह सहकारी संघाच्या माध्यमातून विक्रीची नवी दालने शोधून काढली. ज्यामुळे डाळिंब शेती गोरगरीब सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचली शिवाय येथील गुणवत्तापूर्ण डाळिंबाने थेट युरोपच्या बाजारपेठेत प्राधांन्याने पसंती मिळविली. दरम्यान तत्कांलीन कृषी अधिकारी हराळे साहेबांच्या शास्त्रशुध्द डाळिंब व्यवस्थांपणामूळे अजनाळे सारखे गाव जगाच्या नकाशात ठळक झाले.

### जबाबदारी स्वीकारायला हवी

सांगोल्याची डाळिंब शेती ग्रामीण जीवनाशी एकरूप झाल्याने महाराष्ट्राचे नाव देशासह जगभरात पोहचले. डाळिंबाच्या संशोधन आणि विकासाच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी भारतीय कृषी संशोधन परिषदेने १६ जून २००५ रोजी देशातील एकमेव डाळिंबावर काम करणारी एकमेव संस्था अर्थात राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर येथे स्थापना केले. मात्र गत १७ वर्षात या केंद्राने दोन नविन वाणांबरोबरच उत्पादन ,प्रक्रिया आणि निर्यातवृध्दीसाठी केलेल्या प्रयत्नातून डाळिंब शेती वाढीस काही प्रमानात हातभार लागला असला तरी केंद्राला अद्यापही डाळिंबावरील तेल्या व मर रोग यावर ठोस उपाय सापडलेला नाही. शिवाय संशोधन केंद्राकडून ठोस उपायाऐवजी वर्षानूवर्षे केवळ प्रतिबंधात्मक उपायांची जंत्रीच दिली जातेय अशा प्रकारच्या उपाययोजनामुळे ना प्रार्दूभाव कमी होतोय, ना अडचणी .उलट वाढत्या खर्चातून डाळिंब उत्पादक शेतकरी देशोधडीला लागतोय. ही खेदाची बाब आहे. म्हणून याची जबाबदारी आता संशोधन केंद्राने स्विकारुन पुढील संशोधनाची दिशा निश्चित करायला हवी.

- डॉ. बाबासाहेब देशमुख,
स्व.गणपतराव देशमुख यांचे नातू



## अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाईची मागणी

माढा : माढा मतदारसंघात परतीच्या पावसाने झालेल्या मोठ्या प्रमाणात नुकसानाचे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी माढा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतींने करण्यात आली आहे. माढा मतदारसंघामध्ये दि ६ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर या कालावधीमध्ये अतिवृष्टी झाली असून मागील काही दिवसामध्ये १०० मी.मी. पेक्षा जास्त पाऊस झाल्याने अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. आमदार बबनरावजी शिंदे जिल्हा परिषद सदस्य रणजितसिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले असून अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस, केळी, डाळींब, द्राक्षे, पेरू, लिंबू, भूईमूग, तूर, उडीद, सोयाबीन, मुग, कांदा, टोमॅटो, मिरची, पालेभाज्या, जनावरांचा चारा, यासह इतर फळबागा व अनेक पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे. मुसळधार पावसामुळे तालुक्यातील अनेक गावांतील पाझर तलाव फुटुन शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे.त्याचबरोबर रस्ते खचलेले असून पुल वाहून गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटलेला आहे.तरी अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे सरसकट पंचनामे व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी संबंधीतांना सुचना देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस चे तालुका अध्यक्ष रमेश पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार नाना भांगे,तालुका उपाध्यक्ष शहाजी नाना चवरे, कार्याध्यक्ष रामभाऊ शिंदे, माजी नगरसेवक नागनाथ शिवपुजे, माढा शहराध्यक्ष दता अंबुरे ,उत्तम पालकर, आदीत्य भांगे, सचिन चवरे, औदुंबर चवरे, अशोक चव्हाण, संतोष लोंढे, अजय नाईकवाडे, विकास पवार, भिमराव चौधरी, संतोष पाडुळे, रणजित देवकुळे आदी उपस्थित होते

## गोपालकांना केंद्र सरकारकडून 'गोपाल रत्न' पुरस्कार

कुर्डूवाडी : गोपालन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गोपालकांना केंद्र सरकारकडून गोपाल रत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. यामध्ये पात्र पशुपालक, कृत्रिम रेतन तंत्रज्ञ, सहकारी संस्था, दूध उत्पादक कंपनी आणि शेतकरी उत्पादक संस्थांनी अर्ज करावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह यांनी केले आहे.यासाठी वर्षीच्या पुरस्कारासाठी गोपालकांनी ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गोपाल रत्न पुरस्कार-२०२२ साठी पुरस्कारामध्ये प्रामुख्याने तीन विभागांमध्ये अर्ज



मागविण्यात येत आहेत. प्रत्येक विभागातून तीन याप्रमाणे एकूण नऊ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रथम विभागात गायींच्या ५० जाती आणि म्हशींच्या १७ जातींपैकि कोणत्याही मान्यताप्राप्त देशी जातींची देखभाल करणारे शेतकरी, पशुपालक पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र असतील.दुसरा विभागात राज्य, केंद्रशासित प्रदेश पशुधन विकास मंडळ, राज्य, दूध महासंघ, एनजीओ आणि इतर खासगी संस्थांचे कृत्रिम रेतन तंत्रज्ञ ज्यांनी किमान ९० दिवसांचे कृत्रिम रेतनाचे प्रशिक्षण घेतले आहे ते पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र असतील. तिसऱ्या विभागात सहकारी संस्था, दूध उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक संस्था गावपातळीवर स्थापन केलेल्या दुग्ध व्यवसायात गुंतलेली आणि सहकारी कायदा, कंपनी कायद्यांतर्गत नोंदणीकृत आहे, आणि दररोज किमान १०० लिटर दूध संकलन करते आणि किमान ५० शेतकरी आहेत सदस्य, दूध उत्पादक सदस्य दुग्ध व्यवसायाशी संबंधित आहे.

## ऊस वाहतुकीवर बंदी घालण्याच्या निर्णयाने ऊस उत्पादकांचे नुकसान

पिलीव : महाराष्ट्रात सध्या सर्व साखर कारखान्यानी आपला गाळप हंगाम सुरु केला आहे तर काही कारखानदारांनी आपला गाळप हंगाम सुरु केला आहे यामुळे शेतकऱ्यांनचा ऊस तोडुन कारखान्याकडे नेला आहे तर काहींचा तोडलेला ऊस शेतात पडुन आहे कारण शासनाने १५आकटोंबर पुरवी गाळपास सुरूवात केल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री समीतीने हा निर्णय घेतला आहे. गुरुवार दिनांक १५ऑक्टोबर मध्यरात्री १२वाजेपर्यत ऊस वाहतुकींवर बंदी घालण्याचे आदेश साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी दिले आहेत. यामुळे शेतकऱ्यांनचे प्रचंड मोठे नुकसान झाले. अक्षरश तोडलेला ऊस कारखान्यावर व शेतात वाळुन चाललेला आहे. शासनाचा हा दुदैवी निर्णय शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे. शासनाने जर गाळपाची योग्य तारीख घोषीत केली असती तर शेतकऱ्यांनवर ही वेळ आली नसती सध्या बऱ्याच भागात पाऊस सुरु आहे यामुळे एकतर ऊसतोड करणे अवघड झाले आहे आणी त्या तच शासनाचा हा निर्णय अत्यंत दुर्देवी आहे.

## अकलूजमध्ये रत्नाई मिठाई उपक्रम

सुराज्य/अकलूज

कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या येथील प्रताप क्रीडा मंडळाच्यावतीने समाजातील गरजू लोकांना दिवाळीचा सण साजरा करता यावा, यासाठी योग्य व किफायतशीर दरात रत्नाई मिठाई उपक्रमाच्या माध्यमातून दिवाळी फराळ उपलब्ध करून दिला जाणार आहे.



मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते- पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. गतवर्षी मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा कु.स्वरूपाराणी जयसिंह मोहिते -पाटील यांनी स्वीकारल्यानंतर रत्नाई मिठाई या नावाने हा समाजोपयोगी उपक्रमाला सुरुवात झाली. दर वर्षि हा उपक्रम राबवण्यात येत आहे. प्रताप क्रीडा मंडळाने विविध कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातील स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले आहे.रत्नाई मिठाई वाटप केंद्र, मारुती मंदिराजवळ ,शंकरनगर येथे असणार आहे. दि. १% ते १९ ऑक्टोबर २०२२ या काळात सकाळी १०:०० ते रात्री ८:०० या वेळेत सुरू राहणार आहे.सदरच्या केंद्रात चिवडा लाडू ,बालुशाही, शंकरपाळी,व शेव इत्यादी फराळाचे पदार्थ किफायतशीर दरात उपलब्ध होणार आहेत.हे पदार्थ स्वच्छ व उच्च दर्जाच्या साहित्य पासून बनवलेले आहेत. ना नफा ना तोटा या तत्वावर मंडळाने हा समाज उपयोगी उपक्रम सुरू केला आहे.या साठी नामदेव कुंभार-९५११८०८००४, जयंतराव माने देशमुख-७७२००६७८२४, शिवाजीराव पारसे-८३२९५९००६५, बाळासाहेब सावंत-९९६०१९५८३९ यांच्याकडे नोंदणी करण्याचे आवाहन मंडळाचे सचिव पोपटराव भोसले पाटील यांनी केले आहे.तरी याचा लाभ सर्वांनी घ्यावा व दिवाळीचा आनंद द्विगुणीत करावा असे आवाहन मंडळाच्या वतींने करण्यात आले आहे. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष प्रतापराव पाटील, खजिनदार वसंतराव जाधव, संचालक यशवंतराव माने देशमुख, राजेंद्र देवकर, बिभिषन जाधव, संग्राम रणनवरे , फिरोज तांबोळी, सुहास थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.



## वळसंगच्या रामलिंग चौडेश्वर मंदिरास महेश बिराजदारांकडून लाखांची देणगी

अक्कलकोट : वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे कोजागिरी पौर्णिमा निमित्त महेशदादा बिराजदार यांच्या हस्ते पूजा करण्यात आले. आगामी काळात चौडेश्वरी मंदिरास कळसारण कार्यक्रम होणार असून रंगरंगोटी कामासाठी युवा उद्योजक महेश बिराजदार यांच्या हस्ते एक लाख रुपये देणगी देण्यात आली.

तसेच कळसारोहण कार्यक्रम प्रसंगी कमतरता भासल्यास अधिक मदत करण्यात येईल असे आश्वासन महेशदादा बिराजदार यांनी दिले. नवरात्र निमित्त घेण्यात आलेले स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ सुद्धा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी युवा उद्योजक महेश बिराजदार तर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष चनबसप्पा खैराटे, संगण्णा खैराटे, ग्रा.प.स. शिवानंद चिंचोळी आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्ष अजय इकलक्की, महेश खैराटे, नागनाथ तिपरादी, आकाश अळगुंडगी, अभिलाष अंकद, श्रीनाथ करजगी, सागर खैराटे,दिपक खैराटे, चेतन अंकद, समर्थ खैराटे, राम अळगुंडगी व श्री रामलिंग चौडेश्वरी नवरात्र मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## पाऊस लांबल्यामुळे उसाचा हंगाम लांबणीवर

पंढरपूर : परतीच्या पावसाने महाराष्ट्रात चांगला जोर धरला आहे. त्यामुळे १५ ऑक्टोंबरपासून सुरू होणारा उसाचा हंगाम पंधरा दिवस पुढे जाण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने १५ ऑक्टोंबरपासून ऊस हंगामास सुरुवात करण्याचे सूचना सर्व साखर कारखान्याला दिले आहेत. मात्र सध्या उसामध्ये पाणी असल्यामुळे तूर्तास तरी ऊस तोड होणार नाही.



राज्य सरकारच्या निर्देशानुसार राज्यातील साखर कारखानदारांनी येणाऱ्या ऊस हंगामासाठी कारखाने सज्ज ठेवले आहेत. कारखान्यातील सर्व मेंटेनन्सची कामे पूर्ण केली आहेत. गेल्या वर्षीचा ऊस हंगाम हा जवळपास मे महिन्यापर्यंत चालल्यामुळे या हंगामात गेल्या वर्षी सारखी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी साखर कारखानदारांनी योग्य ती खबरदारी घेऊन प्रोग्राम नुसार ऊस तोडणीचे नियोजन केले आहे. असे असताना परतीचा पाऊस हा लांबण्यामुळे येणारा ऊस हंगाम लांबण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. दिवाळीनंतर आता ऊस तोडणीदार येण्याची शक्यता आहे.

पंढरपूर तालुक्यातील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याकडे २०० टोळ्या आले आहेत. मात्र, हंगाम लांबल्यामुळे या टोळ्या बसून आहेत. जोपर्यंत जमिनीला वापसा येणार नाही, तोपर्यंत ऊस ऊस तोडणी कामगार हे ऊस तोडू शकणार नाहीत. त्यामुळे डोळ्यांना संभाळण्याची जबाबदारी आता कारखान्यावर पडली आहे. परतीचा पाऊस लांबल्यामुळे येणारा हंगाम सुद्धा पंधरा दिवस लागणार आहे त्यामुळे कारखान्याला मोठा फटका बसणार आहे विठ्ठल कारखान्याकडे दोनशे टोळ्या दाखल झाल्या आहेत. येणाऱ्या दोन-तीन दिवसात आणखीन टोळ्या दाखल होण्याची शक्यता आहे.

## आमदारपुत्र यशवंत शिंदे यांना शुटिंगमध्ये सुवर्णपदक

सुराज्य/कुर्डूवाडी

नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया अँड राजस्थान रायफल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जयपूर येथे ३१ व्या ऑल इंडिया जी.व्ही. मालवणकर शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये करमाळा माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजयमामा शिंदे यांचे सुपुत्र तथा विठ्ठल शुगर्स प्रा. लि. म्हैसगाव चे कार्यकारी संचालक यशवंत शिंदे यांनी सिंगल ट्रॅप मध्ये सुवर्णपदक मिळवले. निमगावच्या सरपंच पदाची धुरा सांभाळत तसेच म्हैसगावच्या विठ्ठल शुगर्सची जबाबदारी पार पाडत यशवंत शिंदे यांनी शूटिंगचा आपला छंद जोपासण्याचे पहिल्यापासून काम केले. अनेक विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत अनेक पदकावरतीही आपले नाव कोरले. ३१ व्या ऑल इंडिया जीवी मालवणकर शूटिंग चंपियनशिप मध्ये सुवर्णपदक जिंकून यशवंत शिंदे यांनी माढा करमाळा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या यशाबद्दल माढा माळशिरस आमदार बबनदादा शिंदे, करमाळ्याचे आमदार




संजय मामा शिंदे व उद्योजक रमेश शिंदे यांच्यासह विठ्ठल शुगर्सच्या सर्व अधिकाऱ्यांनी तसेच निमगाव ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांनी यशवंत शिंदे यांचे या सुवर्णपदकाच्या यशस्वी कामगिरीबद्दल अभिनंदन केले. एक राजकारणी व यशस्वी ऊद्योजक या दोन्ही गोष्टीत पारंगत असणारे अन क्रिडा क्षेत्रात आपलं नाव जिल्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर गाजवणारे जिल्ह्यातील यशवंत शिंदे हे पहिलेच नेमबाज आहेत.

## रोजगार हमी योजनेअंतर्गत मागेल त्याला काम नव्हे तर पाहिजे ते काम मिळणार : अडसूळ

बार्शी : बार्शी पंचायत समितीच्या सभागृहात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामरोजगार सेवकांचे प्रशिक्षण शिबीर सुरु आहे.

हे शिबीर तीन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन कक्षा अधिकारी सुधाकर अडसूळ यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमाना पुष्पाहार घालून दिपज्वलन करुन प्रशिक्षणास सुरुवात करण्यात आली.

यावेळी नव्याने सुरु झालेल्या शरदचंद्र पवार समृद्धी योजना तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कामाची माहिती रोजगार सेवक यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत जाते. मागेल त्या सर्वांच्या हाताला काम मिळावे तसेच लाभार्थी समृद्ध ही या योजनेचा उद्देश आहे.



ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर, व्यवसायिक व भूमिहीन कुटुंबियांना लखपती करण्याच्या उद्देशाने फक्त मागेल त्याला काम नाही तर पाहिजे ते काम या उक्तिप्रमाणे १० वर्षाचे नियोजन आराखड्यात कामांचा समावेश करून मी समृद्ध तर गाव समृद्ध पर्यायाने महाराष्ट्र समृद्ध ही संकल्पना साकारली आहे.

## गावाचा विकास झाला तरच देशाचा होईल : पेरे-पाटील

कुर्डूवाडी : गावातील रस्ते स्वच्छ करा, गावातील नागरिकांना स्वच्छ पाणी द्या, लोकांकडुन कर गोळा करा ,पण गावातील लोकांना कराचा हिशोब द्या, गावात जास्तीत जास्त झाडे लावा, सरपंच पदाला जेवढे अधिकार आहेत तेवढे अधिकार कोणालाच नाहीत, सरपंचांनी गावाचा विकास निस्वार्थ भावनेने करावा.

गावाचा विकास झाला तरच देशाच विकास होईल असे आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटिल यांनी प्रतिपादन केले. महाराष्ट्र शासन च्या ग्रामविकास विभागाच्या वतिने सोलापुर जिल्हा परिषद व माढा तालुका पचायत समिती कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रिय ग्राम स्वराज अभियान



कार्यक्रमात राज्यातील आदर्श सरपंच म्हणुन गौरवलेले भास्कर पेरे पाटिल बोलत होते.

यावेळी विचारपिटावर माढा विधानसभेचे आमदार बबनदादा शिंदे, गट विकास अधिकारी डॉ.संताजी पाटिल, मार्केट कमिटीचे ऊपसभापती सुहास पाटिल, बालविकास प्रकल्प अधिकारी आनंद जाधव ऊपस्थित होते. पुढे बोलताना भास्कर पेरे पाटिल म्हणाले की, पाटोदा गावातील प्रत्येक महिला मुलींना सॅनेटेरिंग नॅपकिन फ्रि, गावातील लोकांना दळण मोफत, गावातील लोकांना चार प्रकाराचे पाणी पुरवटा करतो. गावाला व्हाय फाय फ्री, दिपावळीला पंचवीस किलो साखर, गावात व्यायाम शाळा मोफत या सगळ्या सुविधा देतो कारण गाव वर्षाला पाच हजार रुपऐ कर भरतंय. म्हणुन आम्ही सर्व सुविधा देऊ शकतो. असे पेरे पाटिल म्हणाले. गावातील रस्ते गटारी करणं म्हणजे विकास नाही. गावात ग्रामपंचायतीच्या मालकीचे शेतीला ट्रॅक्टर घ्या, गिरणी काढा, रेशन दुकाने टाका, कपडे दुकान टाका व्यावसाय वाढवा अन ग्रामपंचायतीचा नफा वाढवा. कोणतेही काम करताना खोटे बील काढु नका असा सल्लाही भास्कर पेरे पाटिल यांनी दिला. यावेळी आभार प्रदर्शन आनंद जाधव यांनी मांडले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### गाव बनवा पाहिजे तेवढा निधी देतो : बबनदादा शिंदे

लवकरच मी स्वता पेरे पाटलांच्या पाटोदा या विकासाच्या मॉडेलला भेट देणार ग्रामसेवक अधिकाऱ्यांना सोबत नेतो. पण पेरे पाटलांसारखं विकासाचं रोलमॉडेल गाव बनवा. पाहिजे तेवढा निधी देतो असे अश्वासन आ. बबनदादा शिंदे यांनी अध्यक्षीय भाषणात दिले.

## परबांचा ६ कोटींचा रिसॉर्ट पाडण्यासाठी १ कोटींचा खर्च

**मुंबई** : किरीट सोमय्या यांनी माजी मंत्री अनिल परब यांच्याविरोधात मनी लॉड्रिंगचा आरोप करत काही पुरावे ईडीकडे सादर केले होते. मंत्रिपदाचा दुरुपयोग आणि लॉकडाऊनच्या नियमांना डावलून २०20मध्ये दापोलीत तीनमजली रिसॉर्ट बांधल्याचा आरोप किरीट सोमय्यांनी केला होता. आता दापोली साई रिसॉर्ट एनएक्स आणि सी कोच रिसॉर्ट येत्या काही काळात पाडण्यात येणार आहे. मात्र, सहा ते सात कोटी रुपयांत बांधलेल्या या दोन्ही रिसॉर्ट्सला पाडण्यासाठी तब्बल १ कोटींचा खर्च येणार असल्याचं आज खुद्द भाजपा नेते किरीट सोमय्यांनी म्हटलंय. आज त्यांनी त्याबाबत ट्विट केलंय. १,०१,२५००० रुपये रत्नागिरी जिल्हाधिकारी बँक खात्यात आज महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण विभागाने पाठवले आहेत. अनिल परब यांचा रिसॉर्ट तोडण्यासाठी हे पैसे पाठवण्यात आले आहेत. येत्या काळात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाडकामाला सुरुवात होईल, असं ट्विट सोमय्या यांनी केलं आहे.



## महागाईच्या दरात ०.४१ टक्क्यांनी वाढ

**नवी दिल्ली** : देशात महागाईचा दर पुन्हा एकदा वाढला आहे. सप्टेंबर महिन्यात ०.४१ टक्क्यांनी किरकोळ महागाईचा दर वाढला आहे. या वर्षातील एप्रिल महिन्यानंतर ही सर्वाधिक वाढ आहे. ऑगस्ट महिन्यात महागाईचा दर सात टक्क्यांवर होता. तर, आता सप्टेंबर महिन्यात महागाईचा दर ७.४१ टक्के झाला आहे. जुलैमध्ये महागाई दर ६.७१ टक्के तर, गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात ५.३ टक्के महागाई दर होता. फळे आणि भाज्यांचे भाव कडाडल्याने महागाईचा दर वाढला आहे. यामुळे सामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. गेल्यावर्षी सप्टेंबर २०२१ मध्ये किरकोळ महागाई दर ४.३५ टक्के होता. खाद्यपदार्थांच्या महागाईमुळे किरकोळ महागाई दरात मोठी वाढ झाली आहे. सप्टेंबर महिन्यात अन्नधान्य महागाई ८.६० टक्क्यांवर पोहोचली आहे, गेल्या महिन्यात ऑगस्टमध्ये ७.६२ महागाई दर होता. सप्टेंबर महिन्यात शहरी आणि ग्रामीण भागात खाद्यपदार्थांच्या महागाईत वाढ झाली आहे. त्यामुळे महागाईच्या दरात वाढ होत आहे.

## रॉजर बिन्नी बीसीसीआयचे नवे अध्यक्ष?

**नवी दिल्ली** : माजी अष्टपैलू आणि १९८३च्या ऐतिहासिक विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे सदस्य रॉजर बिन्नी यांची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) नवे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड होण्याची दाट शक्यता आहे. बीसीसीआय'ची १८ ऑक्टोबरला निवडणूक होणार असून त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मंगळवार (११ ऑक्टोबर) आणि बुधवारचा (१२ ऑक्टोबर) दिवस होता. मंगळवारी बिन्नी यांनी आपला अर्ज दाखल केला असून आता निवडणूक ही केवळ औपचारिकता असेल असे म्हटले जाते आहे. वेगवान गोलंदाज आणि सक्षम फलंदाज अशी ख्याती असणारे बिन्नी हे १९८३च्या एकदिवसीय विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे सदस्य होते. त्यांनी या स्पर्धेत सर्वाधिक गडी बाद करण्याची किमया साधली होती. त्यांनी आठ सामन्यांत १८ गडी बाद करत भारताच्या विश्वविजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. बिन्नी यांनी २७ कसोटी (४७ बळी व ८३० धावा) आणि ७२ एकदिवसीय (७७ बळी व ६२९ धावा) सामन्यांत भारताचे प्रतिनिधित्व केले. खेळाडू म्हणून निवृत्त झाल्यानंतर बिन्नी यांनी अन्य भूमिका बजावल्या.



## ठाकरेंची पेटलेली मशाल विझवण्याचे काम आम्ही करणार : आठवले

**मुंबई** : राज्यात सध्या अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे आणि शिंदे गटातील वाद अधिकच वाढताना दिसत आहे. दोन्ही गटातील नेत्यांकडून जोरदार आरोपप्रत्यारोप केले जात आहेत. उद्धव ठाकरे गटाकडून शिवसेनेचे दिवंगत नेते रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना उमेदवारी दिली जाण्याची दाट शक्यता आहे. त्यांच्या नावावर जवळपास शिक्कामोर्तब झाल्याचे म्हटले जात आहे. तर, दुसरीकडे शिंदे गटाकडून ऋतुजा लटके यांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे आणि ऋतुजा लटके यांना उद्धव ठाकरे गटाकडून निवडणुकीसाठी उभे राहता येऊ नये म्हणून त्यांचा राजीनामा न स्वीकारण्यासाठी पालिका प्रशासनावर दबाव टाकला जात आहे, असा आरोप ठाकरे गटाने केला आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध नेत्यांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए)चे अध्यक्ष आणि केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांनी देखील या निवडणुकीबाबत प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. रामदास आठवले म्हणाले अंधेरी पोटनिवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा भाजपाच्या उमेदवारास पाठिंबा आहे.

# महागाई की आर्थिक वाढ ?

**सुराज्य/वॉशिंग्टन**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (खचत्र), जागतिक बँकेसह अनेक रेटिंग एजन्सी भारताच्या आर्थिक विकास दराचा अंदाज कमी करत असताना २०२३ मध्ये सादर होणारा केंद्रीय अर्थसंकल्प देशाच्या आर्थिक विकासाचा वेग कायम ठेवेल असा असेल, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले. निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी सांगितले की, भारत पुढील वार्षिक वर्षाची तयारी अत्यंत काळजीपूर्वक करेल जेणेकरून विकासाचा वेग कायम राहील. त्याचवेळी, ते महागाईची चिंता देखील दूर करेल. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेच्या वार्षिक बैठकीला उपस्थित राहण्यासाठी अर्थमंत्री अमेरिकेला गेल्या आहेत.



पुढील अर्थसंकल्पासाठी अजून बराच अवधी असल्याने त्याबाबत नेमके काही सांगणे कठीण होईल. पण व्यापकपणे सांगायचे तर, वाढ ही सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक असेल. मात्र, आम्हाला महागाईबद्दलही चिंता आहे. त्यामुळे जेव्हा आपण महागाई नियंत्रित करण्याविषयी बोलतो तेव्हा विकासदराचे व्यवस्थापन करण्याचा प्रश्न स्वाभाविक आहे. भारताचा पुढील वार्षिक अर्थसंकल्प सीतारामन पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये संसदेत सादर करणार आहेत, ज्याची तयारी डिसेंबरमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

१ फेब्रुवारी २०२३ रोजी अर्थसंकल्प सादर होणार

२०२३ रोजी निर्मला सीतारामन सलग पाचव्यांदा मोदी सरकारच्या दुसऱ्या टर्मचा शेवटचा पूर्ण अर्थसंकल्प सादर करतील. विविध मंत्रालये, विभाग आणि केंद्रशासित प्रदेशांसह वित्त मंत्रालयाच्या पूर्व-अर्थसंकल्पीय बैठकांची मालिका १० ऑक्टोबर २०२२ पासून सुरू झाली आहे, जी १० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. यानंतर अर्थमंत्री उद्योग, सामाजिक क्षेत्र, अर्थतज्ज्ञ, कृषी तज्ज्ञ, स्टार्टअप आणि कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक घेतील आणि अर्थसंकल्पाबाबत सल्लामसलत करतील.

वाढीला प्राधान्य

वाढ आणि महागाई या दोन गोष्टींचा समतोल कसा साधता येईल हे निश्चित करण्याची बाब आहे, असे अर्थमंत्री म्हणाल्या. करोनानंतर भारतीय अर्थव्यवस्थेला जी गती मिळाली, ती पुढील वर्षीही वाढेल याची खात्री करावी लागेल. भारताचे निरीक्षण करणाऱ्या अनेक संस्था त्यांच्या अंदाजाकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. म्हणूनच आपण अत्यंत सावधगिरी बाळगून विकासाचा वेग कायम ठेवणारा अर्थसंकल्प तयार केला पाहिजे.

याशिवाय एका प्रश्नाच्या उत्तरात अर्थमंत्र्यांनी सांगितले की, जागतिक तणावाचा भारतातील ऊर्जा, खते किंवा अन्न यावर परिणाम होतो. आम्ही हे सर्व काळजीपूर्वक पाहत आहोत आणि यामुळे लोकांवर ताण येणार नाही, याची काळजी घेत आहोत. त्यामुळे गेल्या वर्षीच्या आधी आणि या वर्षी जूनच्या सुरुवातीला आम्ही इंधनावरील उत्पादन शुल्क कमी केले जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांना इंधनाच्या वाढत्या दरांचा फटका सहन करावा लागू नये. दुर्बल घटकांना धक्का बसणार नाही याची काळजी घेण्याचा हा एक मार्ग आहे.

### जीएसटी नियमांत बदल; वार्षिक उलाढाल ५ कोटींची

तुमच्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल ५ कोटींपेक्षा जास्त असेल तर ही बातमी तुमच्यासाठी अतिशय महत्त्वाची आहे. जीएसटी परिषदेने आता पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या सर्व व्यवसायांसाठी १ जानेवारीपासून वस्तू आणि सेवा कर (ऋह्ट) अंतर्गत ई-इनव्हॉइसिंग करणे अनिवार्य आहे. जीएसटी परिषद पुढील आर्थिक वर्षात १ कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असलेले सर्व व्यवसाय आणण्याचा विचार करत आहे. महसूल गळती थांबवणे आणि अनुपालन सुधारणे हे या हालचालींचे उद्दिष्ट आहे. ऑनलाइन इनव्हॉइस किंवा ई-इनव्हॉइस अनिवार्य करण्याचा नियम आणला जात आहे जेणेकरून करचोरी रोखता येईल आणि सरकारचे उत्पन्न वाढवता येईल. तसेच ऑनलाइन इन्व्हॉइसिंग करून तक्रारी हाताळणेही सोपे होईल. जीएसटी कौन्सिलने टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रॉनिक इनव्हॉइसिंग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय अगदी लहान व्यवसायालाही अर्थव्यवस्थेच्या कक्षेत आणले पाहिजे हा त्यांचा उद्देश आहे. जीएसटी नेटवर्कने त्यांच्या तंत्रज्ञान पुरवठादारांना डिसेंबरपर्यंत पोर्टलला वाढीव क्षमता हाताळण्यासाठी तयार करण्यास सांगितले आहे.



### ई-इनव्हॉइसिंग म्हणजे काय?

ई-इनव्हॉइस ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये सामान्य जीएसटी पोर्टलवर पुढील वापरासाठी इउइ इनव्हॉइस ऋह्टछ द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रमाणीकृत केले जाते. इलेक्ट्रॉनिक इनव्हॉइसिंग सिस्टीम अंतर्गत, जीएसटी नेटवर्क (ऋह्टछ) द्वारे व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या इनव्हॉइस नोंदणी पोर्टल (खठझ) द्वारे प्रत्येक इनव्हॉइसवर एक ओळख क्रमांक जारी केला जाईल. ई-इनव्हॉइसिंगमध्ये मानक स्वरूप वापरले जाते जे कोणत्याही मशीनद्वारे सहजपणे वाचले जाऊ शकते. यामुळे लहान व्यावसायिक आणि मोठ्या विक्रेत्यांचा व्यवसाय डेटा एकाच ठिकाणी गोळा करणे सोपे होणार आहे. याच्या आधारावर टॅक्स क्रेडिटचा दावा केला जातो त्या आधारे विक्री डेटा देखील गोळा केला जाऊ शकतो.

### ई-इनव्हॉइसचे फायदे

* उद्योगांना त्यांचे इनव्हॉइस प्रक्रिया चक्र सुव्यवस्थित करण्यात मदत करते * इनव्हॉइस प्रक्रिया, मंजूरी, ट्रॅकिंग आणि इनव्हॉइसचा पाठलाग करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ कमी करते * मानवी चुका टाळण्यास मदत होते याशिवाय हे ट्रॅक करणे सोपे आहे.

## राज्यातील २० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**सुराज्य/मुंबई**

शिंदे-फडणवीस सरकारने राज्यातील २० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. औरंगाबाद जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांची मुंबईच्या विकास, आयुक्त असंघटीत कामगार मुंबई पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी औरंगाबादच्या जिल्हाधिकारीपदी कधीकाळी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे जवळचे अधिकारी समजले जाणारे आस्तिक कुमार पांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

खड बदलीचे आदेश

१. मिताली सेठी यांची संचालक, वनामती, नागपूर येथे नियुक्ती, २. वीरेंद्र सिंग, आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांची च.ऊ, चरहर म्हणून नियुक्ती, ३. सुनील चव्हाण जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांची विकास आयुक्त (असंघटित कामगार), मुंबई येथे नियुक्ती, ४. अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांची नागपूरच्या अतिरिक्त महापालिका आयुक्तपदी नियुक्ती., ५. दीपक कुमार मीना, अतिरिक्त महापालिका आयुक्त, नागपूर यांची अतिरिक्त तिरबल आयुक्त,



ठाणे म्हणून नियुक्ती., ६. विनय गौडा, सातारा यांना जिल्हाधिकारी, चंद्रपूर या पदावर नियुक्ती, %. आर के गावडे, सीईओ झेडपी. नंदुरबार येथे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, मुंबई म्हणून नियुक्ती, ८. माणिक गुरसाल, यांची अतिरिक्त आयुक्त (उद्योग) म्हणून नियुक्ती, ९. शिवराज श्रीकांत पाटील, जॉइंट एमडी सिडको, मुंबई यांची एम.डी., महानंद मुंबई म्हणून नियुक्ती, १०. अस्तिक कुमार पांडे, यांची औरंगाबाद येथे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती., ११. लीना बनसोड, यांची आदिवासी देवे म्हणून नियुक्ती, १२. दीपक सिंगला, आदिवासी देवे. कॉर्पोरेशन नाशिक, एमएमआरडीए, मुंबईचे सहआयुक्त म्हणून नियुक्ती., १३. एलएस माली, सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण मुंबई यांची संचालक, जइउ बहुजन कल्याण संचालनालय, पुणे म्हणून नियुक्ती., १४. एस सी पाटील, यांना उपमुख्यमंत्री कार्यालय मंत्रालयाचे सहसचिव म्हणून नियुक्त करण्यात आले., १५. डीके खिलारी, जॉइंट इंस्पेक्टर जनरल ऑफ स्टॅम्प्स यांची सीईओ झेडपी सातारा म्हणून नियुक्ती., १६. एस के सलीमथ नझ पालघर यांची जॉइंट एमडी, सिडको, मुंबई म्हणून नियुक्ती., १%. एसएम कुर्तकोटी, यांची उएज, जिल्हा परिषद नंदुरबार म्हणून नियुक्ती., १८. आर डी निवतकर, आयएएस-२०१० जिल्हाधिकारी मुंबई यांना आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई आणि जिल्हाधिकारी मुंबईचा अतिरिक्त प्रभार देण्यात आला., १९. बीएच पलाव्हे, आयुक्त विभागीय आयुक्त, नाशिक यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, झेडपी पालघर म्हणून नियुक्ती., २०. आर एस चव्हाण यांची महसूल मुद्रांक आणि वन विभाग मंत्रालय, मुंबई या पदावर सहसचिव म्हणून नियुक्ती

## रेल्वे कर्मचाऱ्यांची दिवाळी होणार गोड

**सुराज्य/नवी दिल्ली** : रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदची बातमी आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांची यंदाची दिवाळी गोड होणार आहे. याचे कारण म्हणजे केंद्रीय मंत्रिमंडळाने रेल्वे कर्मचाऱ्यांना बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, रेल्वे कर्मचाऱ्यांना %८ दिवसांचा बोनस दिला जाईल. ते म्हणाले की, ११.२% लाख रेल्वे कर्मचाऱ्यांना १,८३२ कोटी रुपये बोनस दिला जाईल. याची कमाल मर्यादा १७,९५१ रुपये असेल.



यासोबतच तेल वितरण कंपन्यांना २२,००० कोटी रुपयांचे एकरकमी अनुदान देण्यात आला आहे. जेणेकरून आंतरराष्ट्रीय बाजारात एलपीजीच्या किमतीत वाढ होऊनही देशांतर्गत एलपीजीच्या (ङझॠ) किमतीत वाढ न केल्याने नुकसान होऊ नये, तसेच या नुकसानीची भरपाई करता यावी म्हणून हा अनुदान देण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. पत्रकार परिषदेत कॅबिनेट मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले की, गुजरातमधील कांडला येथे दीनदयाल बंदर प्राधिकरणाअंतर्गत कंटेनर टर्मिनल आणि बहुउद्देशीय कार्गो बर्थ बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी सुमारे ६ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे.

### मला गर्दी करणारे आणि खोटे बोलणारे कार्यकर्ते नको : ठाकरे

**मुंबई** : मला गर्दी करणारे आणि खोटं बोलणारे कार्यकर्ते नको, असं वक्तव्य असं महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या अध्यक्ष अमित ठाकरे यांनी केलं. मी दौरा काढल्यापासून अनेक नवनवीन विद्यार्थी आणि तरुण कार्यकर्ते मनसेमध्ये काम करण्यासाठी इच्छुक आहेत. ते मला भेटत आहेत. परंतु गर्दी करणारे आणि खोट बोलणारे कार्यकर्ते मला नको. त्यामुळे मी अनेकांच्या भेटी घेत आहे आणि पक्ष वाढीसाठी नवीन तरुणांना देखील संधी दिली जात आहे, असं म्हणाले. ते बीडमध्ये बोलत होते. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित ठाकरे हे मराठवाडा दौऱ्यावर आहेत.

## आता पॉलिटेक्निकचे शिक्षण मराठीतून मिळणार : पाटील

**सुराज्य/नाशिक**

येत्या ३१ डिसेंबरपर्यंत पॉलिटेक्निकच्या शिक्षणासाठी लागणारी सर्व पुस्तके मराठीतून मिळतील, त्यामुळे पॉलिटेक्निक शिक्षण सहज आणि सोपे होईल, विद्यार्थ्यांना समजण्यास मदत होईल अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. इंग्रजीमध्ये शिकवणाऱ्या प्राध्यापकांनी शक्यतो मराठी शिकवावं. ते जर इंग्लिशमध्ये शिकवणार असेल तर इंग्लिशमध्ये शिकवलेलं मराठीत भाषांतर होण्यासाठी डिवाइस देणार येणार असल्याचेही चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट सांगितले. लघुउद्योग भारती नाशिक इंजिनिअरिंग टॅलेंट सर्च २०२२ स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नाशिकमध्ये पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.



दहावीनंतर पॉलिटेक्निक किंवा बारावीनंतर इंजीनियरिंग साठी प्रवेश घ्यायचा म्हटले की ग्रामीण विद्यार्थ्यांपुढे इंग्रजीचं संकट उभे राहतं. अशात पॉलिटेक्निकची पुस्तके मराठीतून मिळाली तर नक्कीच विद्यार्थ्यांना मदत होईल. आपल्या भाषेतून समजणं आणि ते प्रत्यक्षात उतरवणे सोपे होईल. त्यामुळे मराठीतून पॉलिटेक्निकच्या शिक्षणाचा विद्यार्थ्यांना फायदा होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. त्यासोबतच काही नवीन अभ्यासक्रम आता सुरू करण्यात येणार असून या अभ्यासक्रमांमुळे शिक्षणांबरोबर व्यक्तिमत्व विकास देखील झाला पाहिजे. शिक्षणात स्किल डेव्हलपमेंटचे विषय देखील राज्यातील विद्यापीठांनी घ्यावे, अशा सूचना यावेळी चंद्रकांत पाटील यांनी दिल्या आहेत.

## सीपीआयचे नेते मातोश्रीवर; शिवसेनेला दिला पाठिंबा

**सुराज्य/मुंबई**

कधीकाळी मुंबईतील कामगार, मराठी बहुल भागाने आणि मुंबईसह महाराष्ट्राने शिवसेना आणि कम्युनिस्ट पक्षातील संघर्ष पाहिला. त्याच मुंबईने आज वेगळे चित्र पाहिले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने आज शिवसेना ठाकरेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीसाठी पाठिंबा दिला. भाकप नेत्यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्याने राज्यातील राजकारणातील एक वर्तुळ पूर्ण झाल्याचे म्हटले जात आहे.



उद्धव ठाकरे यांना पाठिंबा

राज्यात मोठ्या प्रमाणावर राजकीय घडामोडी सुरू आहेत. शिवसेनेत फूट पडल्यानंतर अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. या पोटनिवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गटाला भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पाठिंबा दर्शवला आहे. आज दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन भाजपविरोधातील निवडणुकीला पाठिंबा दर्शवला. भाकपच्या शिष्टमंडळात ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते प्रकाश रेड्डी, मुंबई सचिव मिलिंद रानडे, प्रकाश नार्वेकर, विजय दळवी, बबली रावत यांचा समावेश होता. तर, शिवसेनेकडून खासदार अरविंद सावंत, आमदार अनिल परब, आमदार रविंद्र वायकर, सुनील प्रभू, रमेश कोरगावंकर आदी उपस्थित होते.

# 'आई मी नक्की परत येईन'

## कोठडीत असलेल्या संजय राऊत यांचे आईला भावनिक पत्र

**सुराज्य/मुंबई**

अटकेत असलेले शिवसेना खासदार संजय राऊत यांनी आईला भावनिक पत्र लिहिलं आहे. 'आई मी नक्की परत येईन', असं भावनिक पत्र संजय राऊत यांनी त्यांच्या आईला लिहीलं आहे.

संजय राऊत यांनी पत्र लिहित आईला म्हटलं आहे की,आई, मी नक्कीच परत येईन. जशी तू माझी आई आहेस तशीच शिवसेनादेखील आपली आई आहे. आईशी बेइमानी करण्यासाठी माझ्यावर दबाव होता. त्या धमक्यांना मी घाबरलो नाही म्हणून मला तुरुंगात जावं लागलं, असंही संजय राऊत यांनी पत्रात म्हटलं आहे.

संजय राऊत यांनी न्यायालयीन कोठडीत जाण्यापूर्वी सत्र न्यायालयात असताना आईला हे भावनिक पत्र लिहिलं आहे. 'आताच माझी ईडी कोठडी संपली. न्यायालयीन कोठडीत जाण्याआधी कोर्टाच्या बाहेरील बाकड्यावर बसून तुला हे पत्र लिहीत आहे. तुला पत्र लिहिण्याचा प्रसंग अनेक वर्षांनी आला आहे. हे पत्र लिहिण्याची संधी केंद्र सरकारने दिली आहे.' राऊत यांनी पत्रात म्हटलंय की, शिवसेनेच्या म्हणजे महाराष्ट्राच्या शत्रू पुढे झुकणार नाही. शिवसेनेचं आणि स्वाभिमानाचं बाळकडू तुझ्याकडूनच घेतलंय. शिवसेनेशी बेईमानी करायची नाही हे तुच शिकवलं आहे. बाळासाहेबांशी बेईमानी करायची नाही हे तुच मनावर कोरलं आहेस. कठीण काळात शिवसेनेला सोडलं, तर बाळासाहेबांना काय तोंड दाखवणार? देशाच्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकांप्रमाणे मीही अन्यायाविरोधात लढतोय, असंही संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

### ८ ऑगस्ट रोजी लिहिले पत्र

संजय राऊत यांनी ८ ऑगस्ट २०२२ रोजी आईला हे पत्र लिहिलं आहे. संजय राऊत यांच्या ट्विटर अकाऊंटवरून हे पत्र शेअर करण्यात आलं आहे. या पत्रात संजय राऊत यांनी शिवसेनेची तुलना आपल्या आईसोबत केली आहे. शत्रूच्या धमक्यांना घाबरलो नाही फक्त म्हणून आपल्याला तुरुंगात जावं लागलं असंही राऊत यांनी पत्रात म्हटलं आहे.



### संजय राऊतांना १७ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी

पत्राचाळ गैरव्यवहाराच्या आरोपाखाली शिवसेना खासदार संजय राऊत यांना अटक करण्यात आली आहे. मुंबई सत्र न्यायालयानं त्यांना पुन्हा सात दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यामुळे त्यांना १७ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

# बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयास युवा महोत्सवाचे विजेतेपद

## ■ संगमेश्वर कॉलेजला दुसरे तर अकलूजला तिसरे बक्षीस

सुराज्य/सोलापूर

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अठराव्या युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपदाचे प्रथम पारितोषक ९१ गुणांसह बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयाने पटकावले. दुसऱ्या क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद ५० गुणांसह संगमेश्वर कॉलेज तर ४९ गुण घेऊन अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाने तिसरे पारितोषिक मिळविले.**

मंगळवेढा येथील दलित मित्र कदम गुरुजी सायन्स महाविद्यालयात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा अठरावा युवा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. बुधवारी, १२ ऑक्टोबर रोजी पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. सिने अभिनेत्री सैराट फेम रिंकू राजगुरू आणि राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ.राजेश गादेवार यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला. कुलसचिवा योगिनी



घारे, संस्थेचे अध्यक्ष ऍड. सुजित कदम, वित्त व लेखाधिकारी श्रेणिक शहा, तेजस्विनी कदम, प्रियदर्शनी महाडिक, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ कळवणे, डॉ. गुणवंत सरवदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ललित, वांग्मय, नाट्य या तिन्ही विभागाचे सर्वसाधारण विजेतेपद बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयाने पटकावले. नृत्य विभागाचे पारितोषिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अधिविभागास मिळाले. संगीत विभागाचे सर्वसाधारण विजेतेपद दयानंद कॉलेजला मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि पारितोषिकाचे वाचन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले. आभार डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी मानले.



सुरज काळे
(गोल्डन बॉय)



तृप्ती बेंगलोरकर
(गोल्डन गर्ल)

**सांगोल्याची तृप्ती गोल्डन गर्ल तर बार्शीचा सुरज गोल्डन बॉय**

युवा महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनीस 'गोल्डन गर्ल' तर विद्यार्थ्यास गोल्डन 'बॉय'चा किताब दिला जातो. यंदाच्या गोल्डन गर्लची मानकरी सांगोला कॉलेज, सांगल्याची तृप्ती बेंगलोरकर तर गोल्डन बॉयचा किताब बार्शीच्या शिवाजी कॉलेजच्या सुरज काळे यांनी पटकाविला. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

# मुख्याध्यापकाबरोबर गट शिक्षण अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी

### शिक्षक संघटनांची मागणी

सुराज्य/सोलापूर

प्राथमिक शिक्षणाधिकारी किरण लोहार यांनी शनिवारी सुशीलनगरातील जिल्हा परिषद शाळेला भेट देउन डमी शिक्षकाचा शोध लावला होता. याप्रकरणी संबंधीत सहशिक्षक उत्तम गायकवाड यांना नोटीस बजाविल्यावर शिक्षक संघटनांनी आक्षेप घेतला आहे. मुख्याध्यापकाबरोबर गट शिक्षण अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी त्यांनी मागणी केली आहे.

शिक्षणाधिकारी लोहार यांनी सुशीलनगर शाळेला अचानक भेट दिली होती. या भेटीत सहशिक्षक गायकवाड यांच्याजागी एक शिक्षिका शिकवत असल्याचे आढळले होते. याशिवाय गायकवाड हे या शाळेवर एक वर्षांपासून हजर नसताना त्यांचा पगार काढला गेल्याचे निदर्शनाला आले होते. शिक्षणाधिकाऱ्यांनी भेट दिल्यावर शहरातील या शाळेची दुरवस्था आढळली आहे. शहरातील शाळेत नियुक्ती देण्यास शिक्षकांमध्ये रस्सीखेच असते पण शाळेचा पट वाढविण्यासाठी शिक्षक म्हणावे तसे प्रयत्न करीत नसल्याचे दिसून आले आहे. या शाळेत पाहिली ते चौथीपर्यंत केवळ ३५ विद्यार्थी पटावर आहेत. शनिवारी शाळेत यापैकी फक्त १४ विद्यार्थी हजर होते. डमी शिक्षक मानधनावर नेमून जिल्हा परिषदेच्या नियमावलीचा भंग केल्याचे दिसून आले. गायकवाड यांना नीट बोलता व लिहिता येत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांना वैद्यकीय मंडळासमोर हजर राहून वैद्यकीय दाखला आणण्याचे सूचित करण्यात आले आहे.




**मग त्या कर्मचाऱ्यावर मेहरबानी का?**

शिक्षणाधिकारी लोहार यांनी डमी शिक्षक शोधून मूळ शिक्षक गायकवाड यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. वस्तुतः त्यांना पॅरेलेसीस झाला आहे. उत्तर पंचायत समितीतील एक कर्मचारी दोन वर्षापासून आजारी आहे. त्याच्याठिकाणी पत्नी काम करते, मग त्या कर्मचाऱ्यावर का मेहरबानी दाखविण्यात का आली असा सवाल शिक्षक संघाचे शिवानंद भरले यांनी उपस्थित केला आहे. तसेच याबाबत संबंधित विस्तार अधिकाऱ्यांनी प शिक्षणाधिकाऱ्यांना कळविणे गरजेचे होते, असेही ते म्हणाले.

# लाच प्रकरणातून हवालदार निर्दोष

**सोलापूर** : लाच प्रकरणातून टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस हवालदार हनुमंत जाधव यांची विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश एच.डी.अग्रवाल यांनी निर्दोष मुक्तता केली.

जाधव यांनी तक्रारदारांच्या विरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईत मदत केली. तसेच त्याच्याविरुद्ध आलेल्या तक्रारी अर्जामध्ये मदत करण्यासाठी दि.१ ऑक्टोंबर २०१६ रोजी १० हजार रुपये लाचेची मागणी केलेली होती.लाचेची रक्कम स्वीकारताना टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस हवालदार हनुमंत जाधव यांना रंगेहात पकडण्यात आलेले होते. त्यानंतर आरोपी जाधव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन बार्शी येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र पाठवण्यात आलेले होते. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदार तपासण्यात आले.साक्षीदारांच्या साक्षीमध्ये महत्त्वपूर्ण व ठळक विसंगती व तफावती असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.तसेच सरकार पक्षातर्फे देण्यात आलेला पुरावा हा आरोपीस शिक्षा करण्यापर्यंत पुरेसा नसल्याचे तसेच तक्रारदाराने त्याच्यावर होणारी संभाव्य कारवाई टाळण्यासाठी जाधव यांना लाच प्रकरणात खोटेपणाने गुंतवले असल्याचे ॲड.निलेश जोशी यांनी न्यायालयासमोर आलेल्या पुराव्यावरून दाखवून देवून सर्वोच्च न्यायालयाचे व मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे सादर केले.याप्रकरणात ॲड.निलेश जोशी यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून पोलीस हवालदार हनुमंत रंगनाथ जाधव यांची निर्दोष मुक्तता केलेली आहे.या प्रकरणात आरोपी जाधव यांच्या वतीने ॲड. निलेश जोशी, ॲड.यशश्री जोशी, ॲड.कैलास बडवे, ॲड.मल्लिनाथ बिराजदार, ॲड.पैगंबर सय्यद, ॲड. राणी गाजूल, ॲड.ओंकार परदेशी, ॲड. सोनाली कोंडा यांनी काम पाहिले.

# दुहेरी जलवाहिनी कामाचा मक्ता 'लक्ष्मी'ला देण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब



सुराज्य/सोलापूर

उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी टाकण्याच्या ६३१ कोटींच्या कामाचा मक्ता कोल्हापूरच्या लक्ष्मी इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला देण्याचा निर्णय सोलापूर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन कंपनीच्या बैठकीत बुधवारी एकमताने घेण्यात आला. या कंपनीला ३० महिन्यांत हे काम पूर्ण करायचे आहे. दिवाळीपूर्वी काम सुरू होईल, असा विश्वास स्मार्ट सिटीचे कार्यकारी संचालक त्रिंबक ढेंगळे- पाटील यांनी व्यक्त केला.

बुधवारी स्मार्ट सिटीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवारी जिल्हा नियोजन भवनात झाली. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, मनपा आयुक्त पी. शिवशंकर, सहायक संचालक नगररचना पुणे पवार, स्मार्ट सिटीचे कार्यकारी संचालक त्रिंबक ढेंगळे- पाटील, मुख्य तांत्रिक अधिकारी संदीप कारंजे, संजय धनशेट्टी यांची उपस्थिती होती. बैठकीचे अध्यक्ष आणि कंपनीचे चेअरमन असीम गुप्ता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. स्मार्ट सिटी कंपनीने आठ महिन्यांपूर्वी समांतर जलवाहिनीच्या कामाची ६३९ कोटी रुपयांची निविदा काढली होती. एकूण चार कंपन्यांनी निविदा भरली. यापैकी एक कंपनी अपात्र ठरली. लक्ष्मी इंजिनिअरिंग कंपनीने सर्वात कमी ६३१ कोटी रुपये दराने ही निविदा भरली. ही कंपनी तांत्रिक आणि आर्थिक क्षमतेत पात्र असल्याचा अहवाल या कामाचे प्रकल्प सल्लागार जीवन प्राधिकरणने दिला. त्यानुसार या कंपनीला वर्कऑर्डर देण्याचा ठराव झाला. दरम्यान, राज्य शासनाकडून या कामासाठी २०० कोटी रुपये निधीसाठी महापालिका प्रशासनाने पत्रव्यवहार केला आहे. याच्या पूर्ततेसाठी स्मार्ट सिटी चे मुख्य कार्यकारी अधिकारी ढेंगळे -पाटील व महापालिका आयुक्तांनी पाठपुरावा करावयाचा आहे अशी सूचना चेअरमन गुप्ता यांनी केली आहे. शासनाच्या पुरवणी प्रस्तावामध्ये हा विषय मार्गी लागणार आहे.

**■ महापालिका कामाचा आढावा घेणार**

दुहेरी जलवाहिनीचे कामात सातत्य रहावे, या दृष्टिकोनातून महापालिका प्रशासन दक्षता घेणार आहे. दर आठवड्याला वर्कशीट प्रमाणे काम झाले पाहिजे. त्यासाठी स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दर आठवड्याला या कामाची पाहणी करावी. त्याचबरोबर दर पंधरा दिवसांनी महापालिका प्रशासन या कामाचा आढावा घेणार आहे. साधारण ३० महिन्यात हे जलवाहिनी टाकण्याचे काम संबंधित कंपनीला पूर्ण करावयाचे आहे, असे महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी सांगितले.

**■ सीसीटीव्हीचा मक्ता अलाईट डिजिटल कंपनीला**

शहरात १३० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या कामाचा मक्ता मुंबईच्या अलाईट डिजिटल कंपनीला देण्याचा निर्णय या बैठकीत झाला. यापूर्वीच याच कंपनीला कंट्रोल अँड कमांड सेंटरच्या इमारती बांधकामाचा मक्ता देण्यात आला आहे. आजच्या बैठकीमध्ये शहरात विविध १३० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या ५ कोटी ४४ लाखांच्या कामाचा मक्ता या कंपनीला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ५० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे नियोजन होते. त्यात वाढ करून आता १३० ठिकाणी हे कॅमरे शहरात बसविण्यात येणार आहेत, अशी माहिती स्मार्ट सिटी कार्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी त्र्यंबक डेंगळे पाटील यांनी दिली.

# पनाश टॉवर प्रकरणी महापालिका सर्वोच्च न्यायालयात अपील करणार

सुराज्य/सोलापूर

विजापूर रोडवरील बहुचर्चित पनाश टॉवर प्रकरणी उच्च न्यायालयाने दिलेल्या निकाला विषयी कायदेशीर माहिती घेण्यात येईल. त्यानंतर महापालिका सर्वोच्च न्यायालयात अपील करणार असल्याची माहिती आयुक्त पी.शिवशंकर यांनी दिली.

विजापूर रोडवरील पनाश इमारतीच्या बांधकामा बाबत महापालिकेने गॅलोर कंपनीला बजावलेल्या तीनही नोटीसा उच्च न्यायालयाने रद्द केल्या आहेत. पनाशच्या जागेत महापालिकेला ४८६.४७ स्क्वेअर मीटर जागा मिळाली आहे. त्याऐवजी १६३५.४५ स्क्वेअर मीटर देण्यात यावी असे आदेश आयुक्तांनी दिले होते. जागा देण्यासंदर्भात आयुक्तांचा हा आदेशही उच्च न्यायालयाने फेटाळून लावला. पनाशच्या फ्लॅटची खरेदी विक्री थांबविण्याचे आदेशही रद्द केले आहेत. महापालिकेच्या तत्कालीन आयुक्तांनी २०१९ मध्ये ४९६.४७ स्क्वेअर मीटर जागा घेण्याचा निर्णय न्यायालयाने योग्य ठरविला आहे. यात कोणत्याही प्रकारे व्याख्या तपासण्याची आवश्यकता नाही असेही न्यायालयाने म्हटले आहे. महापालिका प्रशासनाची पुढील काय कार्यवाही राहील याबाबत विचारले असता महापालिका आयुक्त पी.शिवशंकर म्हणाले की, उच्च न्यायालयाच्या निर्णयासंदर्भात कायदेशीर माहिती घेण्यात येत आहे. कायदेशीर सल्ला घेतल्यानंतर महापालिका प्रशासन जागे संदर्भात सर्वोच्च न्यायालयात अपील करणार आहे असे स्पष्ट केले.



पूर्व भागातील बालाजी मंदिरात १ नोव्हेंबरपासून ब्रह्मोत्सवास सुरूवात होत आहे. त्यापार्श्वभूमीवर बालाजी मंदिरात रंगरंगोटी करण्यात येत आहे.

# लाड पागे शिफारशीमधील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करा : जिल्हाधिकारी

**सोलापूर** : सफाई कामगारांच्या योजनांची अंमलबजावणी संबंधित यंत्रणांनी करावी. लाड पागे समितीच्या शिफारशीमधील सफाई कामगारांची पदभरती आणि इतर प्रलंबित प्रकरणांचा निपटारा संबंधित यंत्रणांनी तत्काळ करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या.



हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तिस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम २०१३ जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झाली. या बैठकीला समिती सदस्या आमदार प्रणिती शिंदे, समाज कल्याणचे सहायक आयुक्त कैलास आढे, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील, राकेश निळकंठ यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते. बैठकीमध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या योजना, मुलांची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सदनिका, सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधाबाबत चर्चा करण्यात आली.

सफाई कामगारांच्या घराबाबत मनपाने जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सदस्य बालव्या मंडेपू यांनी केली. यावर जिल्हाधिकारी शंभरकर यांनी याबाबत सोलापूर मनपाने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. आ.शिंदे यांनी लाड पागे समितीच्या शिफारशींची त्वरित अंमलबजावणी करून सफाई कर्मचाऱ्यांची रिक्त पदे त्वरित भरण्याची मागणी केली. जिल्हाधिकारी शंभरकर यांनी सर्व संबंधित यंत्रणांनी आपापल्या स्तरावर रिक्त जागा भरण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

# हुबळी-निजामुद्दीन-हुबळी रेल्वेसेवा सुरू

## रेल्वेमंत्र्यांकडून सोलापूरकरांना दिवाळी भेट : खा.महास्वामी

**सोलापूर** : सोलापूरहून दिल्लीस जाण्यासाठी कर्नाटक एक्स्प्रेस केवळ एकच रेल्वे आहे. त्यामुळे दिल्लीकडे जाण्यासाठी नवीन रेल्वेची अत्यंत आवश्यकता होती. म्हणून हुबळी-नवी दिल्ली ही रेल्वे सेवा सोलापूर मार्गे करावी जेणेकरून कर्नाटक, महाराष्ट्र, मध्यप्रदेश राज्यातील प्रवाश्यांना याचा लाभ होईल यासाठी वारंवार खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी मागणी केली होती. त्या मागणीस यश आले असून हुबळी - निजामुद्दीन - हुबळी ही नवी साप्ताहिक रेल्वे सोलापूरमार्गे दिल्लीस जाण्याची सुविधा होणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडून सोलापूरकरांना दिवाळी भेटच मिळाल्याची भावना खा. डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी व्यक्त केली.



हुबळी येथे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते हुबळी - निजामुद्दीन - हुबळी रेल्वे क्रमांक २०६५७/५८ या नवी रेल्वेस झेंडा दाखवून सुरुवात केली. सोलापूरमार्गे दिल्लीस जाण्यासाठी प्रति शनिवारी सकाळी ८.३५ वाजता तसेच सोलापूरहून हुबळीकडे जाण्यासाठी प्रति सोमवारी रात्री ७ वाजता रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे कर्नाटक एक्स्प्रेस शिवाय ही दुसरी रेल्वे गाडी दिलीस जाण्यासाठी सुविधा होणार आहे. सध्या ही गाडी साप्ताहिक असून ही गाडी दररोज सुरू करण्याची मागणी करणार असल्याचेही खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी सांगितले.

हुबळी-सोलापूरमार्गे नवी दिल्लीसाठी नवी रेल्वे सुरू करण्याची मागणी गेल्या ३ वर्षांपासून खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी केली होती. ८ ऑक्टो. २०२० रोजी मध्य रेल्वे विभागीय समिती बैठकीत, १६ ऑक्टो. २०२१ हुबळी विभागीय दक्षिण पश्चिम रेल्वे समिती बैठक, १७ मार्च २०२२ अर्थसंकल्पीय अधिवेशनात तसेच रेल्वे अर्थसंकल्पीय बैठकीत तसेच ८ जुलै रोजी मध्य रेल्वे विभागीय समिती बैठकीत याबाबत मागणी केली होती. तसेच १५ मार्च २०२२ रोजी संसदेतही याबाबत मागणी केली होती. या मागणीचा विचार करता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री प्रल्हाद जोशी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी सोलापूरकरांना दिवाळी भेटच दिल्याबद्दल खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी सर्वांचे समस्त सोलापूरकरांच्या वतीने आभार व्यक्त केले.

उत्तर भारत व दक्षिण भारत ( हुबळी) कडे जाण्यासाठी दुसरी रेल्वेसेवा उपलब्ध झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ही मागणी मी करीत होतो, त्याचा केंद्रीय नेतृत्वाने मान्य करीत नवी रेल्वेसेवा सुरू केल्याचे खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी सांगितले.

# भांडणाचा राग मनात धरून विटाने मारहाण

सुराज्य/सोलापूर

रिमांड होममध्ये झालेल्या भांडणाचा राग मनात धरून एकास विटाने पाठीवर मारून जखमी केल्याची घटना दि.११ ऑक्टोंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास उत्तर सदर बाजार लष्कर सोलापूर येथे घडली. याप्रकरणी अजय अमरसिंग कोलाकाटी (वय-२६, रा.उत्तर सदर बाजार, लष्कर) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून राहुल मन्सावाले, राकेश दशरथ मन्सावाले, शुभम सुरेश मन्सावाले, सुरेश चंदूसिंग मन्सावाले (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




दि.११ ऑक्टोंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास रिमांड होम मध्ये फिर्यादी यांचा भाऊ युवराज कोलाकाटी यांच्यासोबत झालेल्या भांडणाचा राग मनात धरून वरील संशयित आरोपी यांनी मारहाण केली. त्यानंतर राहुल मन्सावाले याने फरशीने फिर्यादीच्या हाताच्या बोटाला मारून जखमी केले.तसेच राकेश मन्सावाले याने विटाने पाठीवर मारले.असे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक इनामदार हे करीत आहेत.

### चोरट्याने घरातून रकमेसह सोन्याचे दागिने पळवले

सोलापूर (प्रतिनिधी) अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील २८ हजार २०० रुपये किमतीचे चार ग्राम वजनाचे सोन्याचे जीरामणी व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना दि.१० ते ११ ऑक्टोंबर दरम्यान भारत नगर शिंदे शाळेच्या पाठीमागे जुना विडी घरकुल येथे घडली. याप्रकरणी संतोष हनंमतु जमादार (वय-३५,रा.भारत नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.जमादार हे घरात झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या जिन्यावरून घरामध्ये प्रवेश केला. त्यानंतर किचनरूम मधील फ्रिजवर ठेवलेले सोने व रोख रक्कम चोरट्याने चोरून नेली आहे. असे फिर्यादित म्हटले आहे.

### किरकोळ कारणावरून दगडाने मारहाण

**सोलापूर** : किरकोळ कारणावरून दगडाने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.११ ऑक्टोंबर रोजी महालक्ष्मी सोसायटी शेळगी येथे सकाळी साडेआठ वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी बबीता नागनाथ शेटे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सुनिता विरेध मुधाळे व योगेश मुधाळे (दोघे.रा.महालक्ष्मी सोसायटी,शेळगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक पैकेकरी हे करीत आहेत.

### अल्पवयीन मुलीला फुस लावून पळविले

**सोलापूर** : एका सोळा वर्षाच्या अल्पवयीन मुलीला एका तरुणाने कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेल्याची घटना सोलापुरात घडली.याप्रकरणी पीडित मुलीच्या वडिलांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.